कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. ५ जून २०२६
किंमत ४ ₹

## केरळात मान्सून दाखल

**पुणे :** बऱ्याच प्रतीक्षेनंतर भारतात मान्सूनचे आगमन झाले आहे. नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल झाला असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने गुरुवारी (दि.४) जाहीर केली. दक्षिण भारतातील या राज्यात बऱ्याच काळापासून पाऊस सुरू होता, पण आता याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. हवामान विभागाने सुरुवातीला पावसाळा ३० मे पर्यंत सुरू होऊ शकतो अशी शक्यता वर्तवली होती. तरीही मान्सूनला विलंब झाला. इतकेच नव्हे तर मान्सून नेहमीच्या १ जूनच्या तारखेला दाखल झाला नाही, त्यामुळे पावसाला चार दिवसांचा उशीर झाला. गुरुवारी सकाळी केरळच्या अनेक जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यात पान २ वर




## वेधक

### नवी मुंबई विमानतळावर 'हल्ल्याचा थरार'

**उरण :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर मध्यरात्री अचानक गोळीबार सुरू झाला. संशयित दहशतवाद्यांनी विमानतळ परिसरात घुसखोरी केल्याची माहिती मिळाली आणि काही क्षणांत संपूर्ण सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर गेली. मात्र हा प्रत्यक्ष हल्ला नव्हता. तर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) राबविलेली एक व्यापक मॉक ड्रिल होती. विमानतळासारख्या अतिसंवेदनशील ठिकाणी दहशतवादी हल्ला, घुसखोरी किंवा महत्त्वाच्या सुरक्षा यंत्रणांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला कशा प्रकारे प्रत्युत्तर द्यायचे, याची चाचणी घेण्यासाठी ही सराव मोहीम राबविण्यात आली. मध्यरात्रीच्या शांत वातावरणात पान २ वर

### गुंड सचिन घायवळला अटक

**पुणे :** कुख्यात गुंड सचिन घायवळ याला राजस्थानातून पुणे पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. निलेश घायवळ आणि सचिन घायवळ या दोन्ही बंधूंच्या पुण्यातील कारवायामुळे राज्य आणि देश पातळीवर पुण्याचे नाव बदमान होत आहे. सचिन घायवळ याला राजस्थानातून पकडण्यात यश आल्याने आता या प्रकरणातील त्याच्यावर दाखल गुन्ह्यांचा तपास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. निलेश घायवळ याच्या विरोधात यापूर्वी मोक्का लावण्यात आला होता. निलेश याचे शेवटचे लोकेशन लंडन येथे आढळले होते. त्यातच आता सचिन घायवळ पुणे पोलिसांना राजस्थानात सापडला आहे. सचिन आपले नाव आणि वेष बदलून राजस्थानात रहात होता अशी माहिती पोलिसांच्या सूत्रांनी दिली होती. पुण्यातील घायवळ गँगला सचिन घायवळ याच्या अटकेने मोठा पान २ वर

# राजकारणाला कलाटणी देणारा विजय - जयंत पाटील

## शिंदे गटाला रेवदंड्यात जोरदार धक्का

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक ही एक वेगळ्या पध्दतीने लढविली आहे. याचे सर्व श्रेय संतोष मोरे यांना जात आहे. रेवदंड्यातील शेकाप, महाविकास आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्यांनीदेखील या विजयासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. त्यामुळे हा ऐतिहासिक विजयाचा दिवस आहे. रेवदंडाकरांनी शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा नवसंजीवनी देण्याबरोबरच पुनर्जिवीत करण्याचे काम केले आहे. तालुक्यातील राजकारणाला कलाटणी देणारा हा विजय आहे, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.





रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकीत संतोष मोरे यांचा मंगळवारी (दि.२) बहुमतांनी विजय झाला. यानिमित्ताने रेवदंड्यामध्ये गुरुवारी (दि.४) विजयाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सभेमध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जयंत पाटील बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, अनिल पाटील, सुरेश खोत, शरद वरसोलकर, दादा मोरे, सोनाली मोरे आदी शेकापसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते, महिला उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकीत पराजय झाला. मात्र या पराजयानंतर कार्यकर्ते डगमगले नाही. पुन्हा नव्या उमेदीने कार्यकर्ते कामाला लागले. शेतकरी कामगार पक्षाला जय-पराजय नवीन नाही. शेतकरी कामगार पक्ष हा संघर्षातून निर्माण होऊन पुन्हा उभा राहणारा आहे. ज्यांनी गद्दारी केली, त्यांना ठेचून काढायचे आहे. उपसरपंच पदाच्या पान २ वर

## १२० कोटींची ई-सिगारेट, व्हेप जप्त

| उरण | प्रतिनिधी |

देशात ई-सिगारेट आणि व्हेपच्या उत्पादन, आयात, विक्री, वाहतूक आणि साठवणुकीवर कायद्याने बंदी असतानाही तस्करांनी या बंदीची अक्षरशः खिल्ली उडवत कोट्यवधी रुपयांचा काळाबाजार उभारल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) महाराष्ट्रातील जेएनपीए परिसरासह गुजरात, पश्चिम बंगालमधील बंदरे, विमानतळ आणि विविध ठिकाणी केलेल्या धडक कारवाईत तब्बल १२० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या सुमारे तीन



लाख ई-सिगारेट आणि व्हेप जप्त केल्या आहेत.

या कारवाईमुळे देशातील तरुणाईला व्यसनाच्या गर्तेत ढकलणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय तस्करी साखळीचा पर्दाफाश झाला असून, बंदी असतानाही हा व्यवसाय किती मोठ्या प्रमाणात फोफावला आहे, हे स्पष्ट झाले आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने २०१९ मध्ये इलेक्ट्रॉनिक सिगारेटच्या उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरातींवर संपूर्ण बंदी घालणारा कायदा लागू केला होता. मात्र कायद्याच्या धाकालाही न जुमानता तस्करांनी परदेशातून या उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर आयात करून देशभर विक्रीचे जाळे उभे केल्याचे तपासात उघड झाले आहे.

विशेष म्हणजे, आकर्षक डिझाईन, रंगीबेरंगी स्वरूप, विविध फ्लेवर्स आणि तथाकथित आधुनिक जीवनशैलीचे प्रतीक म्हणून व्हेपिंगचा प्रचार केला जात आहे. यामुळे महाविद्यालयीन युवक-युवती आणि अल्पवयीन मुलांमध्ये याचे आकर्षण झपाट्याने वाढत आहे. याच कमकुवत दुव्याचा फायदा घेत तस्करांनी कोट्यवधी रुपयांची बाजारपेठ निर्माण केली आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, ई-सिगारेटमध्ये पारंपरिक तंबाखू नसली तरी त्यामधून निकोटिन आणि अनेक घातक रासायनिक घटक शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे फुफ्फुसांचे आजार, हृदयविकार, व्यसनाधीनता आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो. पान २ वर

## अनिकेत तटकरे बिनविरोध

### बाळ माने यांची ठाकरे गटातून हकालपट्टी

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

कोकण विभाग स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेच्या जागेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अत्यंत चुरस निर्माण झाली होती. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) अनिकेत तटकरे यांना उमेदवारी दिली होती, तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाने बाळ माने यांना रिंगणात उतरवले होते. मात्र, ऐनवेळी बाळ माने यांनीच आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीतील संपूर्ण रंगत संपली असून, अनिकेत तटकरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.



राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी ठाकरे गटाला धक्का बसला. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधानपरिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सुरेंद्र ऊर्फ बाळ माने यांनी थेट भाजपचे मंत्री पान २ वर

### बाळ मानेंचे स्पष्टीकरण

कोकण विधानपरिषद मतदारसंघात महाविकासच्या वतीने शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दोन दिवसांपूर्वी छाननी झाली. त्यात सहाच्या सहा उमेदवार वैध ठरले. या निवडणुकीत १०१८ मतदार आहेत. महाविकास आघाडी म्हणून आमचे संख्याबळ २०० च्या आसपास आहे. लोकशाहीत निवडणुका लढवल्या पाहिजेत, बिनविरोध निवडणुका होऊ नयेत, या मताचे आपण होतो. मी मतदारांच्या भेटीच्या निमित्ताने काहींना भेटण्याचा प्रयत्न केला; अनेक जण तीर्थयात्रेला गेल्याचे माझ्या लक्षात आल्यानंतर ही निवडणूक लढविण्यात काही फायदा होणार नाही, हे लक्षात आल्यानंतर उमेदवारी मागे घेतल्याचे बाळ माने म्हणाले.

## जासईत मातीच्या ढिगाऱ्यात मानवी कवटी

| उरण | प्रतिनिधी |

एका बाजूला निसर्गाचा संहार करत डोंगर पोखरले जात असतानाच, आता उरण तालुक्यातील जासईमध्ये चक्क मानवी अवशेष सापडल्याने संपूर्ण रायगड जिल्हा हादरला आहे. दादरपाडा बस स्थानकासमोरील बिअर शॉपजवळ टाकण्यात आलेल्या मातीच्या ढिगाऱ्यात एक मानवी कवटी आढळून आली आहे.



या भयानक प्रकारामुळे बेकायदेशीर माती उपशाच्यामागे एखादे मोठे गुन्हेगारी रॅकेट किंवा हत्याकांडाचे रहस्य दडले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जासईतील बेकायदेशीर उत्खननाला गुन्हेगारीचे वळण लागले आहे. उरण तालुक्यात सध्या कायद्याचे नियम धाब्यावर बसवून माती खोदा आणि पैसे कमवा हा एकच अजेंडा राबवला जात आहे. स्थानिक मातीमाफियांनी जासई परिसरातील डोंगरांची अशी काही चाळण केली पान २ वर

## होळीच्या माळावर तात्पुरते रुग्णालय

| रायगड | प्रतिनिधी |

श्री शिवराज्याभिषेक या सोहळ्यानिमित्त लाखो शिवभक्त हे किल्ले रायगडावर येत असतात. त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी होळीचा माळ येथे जिल्हा रुग्णालयातर्फे २५ खाटांच्या सुसज्ज व सर्व सोयींनीयुक्त अशा तात्पुरत्या रुग्णालयाची उभारणी करण्यात येणार आहे.

### खासगी व शासकीय रुग्णालयात खाटा राखीव

कोणत्याही प्रकारची आपत्कालीन घटना घडल्यास नागरिकांची उपचारांअभावी गैरसोय होऊ नये, यासाठी ४ शासकीय व १० खासगी रुग्णालयांमध्ये एकूण २६० खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

त्याप्रमाणे वैद्यकीय पथके २४ कार्यरत असणार आहेत.

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने ५ व ६ जून या कालावधीमध्ये किल्ले रायगडावर विविध ठिकाणी आरोग्य पथके २४ तास कार्यरत असतील. प्रत्येक पथकासोबत रुग्णांना संदर्भित करण्यासाठी झोळी स्ट्रेचर आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. गडावरील रोप वे स्थानक, राजसदर, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर व गडाखालील रोप वे स्थानक येथे तज्ज्ञ वैद्यकिय पथके २४ तास कार्यरत असणार आहेत.

### वैद्यकीय पथके २४ तास कार्यरत

प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड येथे ५ अतिदक्षता खाटा (आयसीयु) व ३० सर्वसाधारण खाटांचे सुसज्ज रुग्णालय ऑक्सिजन सुविधेसह कार्यरत पान २ वर



# महाडमध्ये अंधारात बिबट्याचा थरार!

- शेतकऱ्याच्या गोठ्यात घुसून कालवडीची शिकार
- दाभोळ परिसरात भीतीचे सावट

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील ग्रामीण परिसरात अलिकडच्या काळात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड घबराट आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे महाड तालुक्यात एकाच आठवड्यात बिबट्या दिसण्याची ही दुसरी घटना आहे. काही दिवसांपूर्वीच मुठवली परिसरात बिबट्याचा वावर आढळून आला होता, आणि ती दहशत ताजी असतानाच आता दाभोळ (खलाटी) परिसरात बिबट्याने थेट हल्ला चढवल्याने खळबळ उडाली आहे.

दाभोळ भागातील स्थानिक शेतकरी रामचंद्र पेंढारी यांच्या वाड्यात एकूण पाच गुरे होती. बुधवारी रात्री ११:३० च्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे सर्व गुरांना चारा घातला आणि त्यानंतर संपूर्ण गाव साखरझोपेत गेले. मात्र, मध्यरात्रीच्या सुमारास एका हिंस्त्र बिबट्याने थेट गोठ्यात घुसून धुमाकूळ घातला. गोठ्यात बांधलेल्या प्राण्यांपैकी एका अडीच ते तीन वर्षांच्या निष्पाप कालवडीवर बिबट्याने झडप घातली आणि तिला गळा दाबून जागीच ठार केले. एवढेच नव्हे तर, तो तिला गोठ्यातून बाहेर फरफटत घेऊन गेला. गुरुवारी सकाळी जेव्हा पेंढारी गोठ्यात गेले, तेव्हा त्यांना आपली कालवड गायब असल्याचे दिसले. शोधाशोध केली असता, गोठ्यापासून काही अंतरावर कालवडीचा छिन्नविच्छिन्न झालेला मृतदेह आढळून आला. या थरारक घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच संपूर्ण गावात भीतीचे सावट पसरले. घटनेचे गांभीर्य ओळखून वनविभागाचे वनपाल सचिन विश्वास मेणे आणि वनरक्षक धिरेश थळकर यांनी तातडीने घटनास्थळाला भेट दिली व मृतदेहाचा आणि परिसराचा पंचनामा केला.

पंचनामा करत असताना वनविभागाच्या अधिकाऱ्यांना आणि ग्रामस्थांना घटनास्थळाच्या आजूबाजूला बिबट्याच्या पंज्यांचे वेगवेगळे ठसे आढळून आले. यात काही ठसे खूप मोठ्या आकाराचे, तर काही लहान आकाराचे होते. यावरून वन्यजीव तज्ज्ञांनी आणि वनविभागाने असा अंदाज वर्तवला आहे की, परिसरात केवळ एकटा बिबट्या नसून, एक मादी बिबट्या तिच्या लहान पिल्लांसह शिकार शिकवण्यासाठी किंवा संरक्षणासाठी फिरत आहे. पिल्ले सोबत असल्यामुळे मादी बिबट्या अधिक आक्रमक आणि धोकादायक बनण्याची शक्यता असते, याच कारणामुळे दाभोळ परिसरातील ग्रामस्थांमधील दहशत दुपटीने वाढली आहे.

दाभोळ परिसरातील घरांची आणि शेतांची रचना विखुरलेली आहे, तसेच आजूबाजूला दाट झाडी आहे. ही भौगोलिक परिस्थिती बिबट्याला लपण्यासाठी आणि पाळीव जनावरांवर दबा धरून अचानक हल्ला करण्यासाठी अत्यंत अनुकूल ठरत आहे.

> “आम्ही घटनेचा पंचनामा केला असून पीडित शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. महाडमध्ये एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा असा वावर समोर आल्याने वनविभाग सतर्क आहे. ग्रामस्थांनी रात्री एकटे बाहेर पडणे टाळावे आणि गोठ्यांजवळ प्रखर प्रकाश ठेवावा.”
> –सचिन मेने (वनपाल अधिकारी)

> “दोन वर्षांपूर्वीही माझ्या गुरांवर बिबट्याने असाच हल्ला केला होता. आमच्या गोठ्याच्या अगदी बाजूलाच घनदाट जंगल असल्याने येथे वन्यजीवांचा धोका सतत असतो. तसेच परिसरात माकडे आणि डुकरांचाही मोठा वावर आहे. बिबट्याने कालवडीला ठार केल्याने आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण कुटुंब दहशतीत आहे. वनविभागाने तातडीने कॅमेरा ट्रॅप बसवून या बिबट्याचा बंदोबस्त करावा, तसेच जंगली श्वापदांपासून कायमस्वरूपी संरक्षणासाठी येथे संरक्षण भिंत उभारून द्यावी.”
> –रामचंद्र पेंढारी (पीडित शेतकरी, दाभोळ)

# कोकणचा प्रवास सुपरफास्ट!

- १२०० कोटींच्या रेवदंडा खाडीपुलाच्या कामाला वेग
- वळसा घालून जाण्याचा फेरा वाचणार

| रायगड | प्रतिनिधी |

बहुप्रतीक्षित रेवस–रेड्डी सागरी महामार्गावरील रेवदंडा खाडीपुलाच्या उभारणीच्या कामाला वेग आला असून, कोकण किनारपट्टीच्या दळणवळण व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून अशोका बिल्डकॉन लिमिटेडकडून पुलाचे बांधकाम करण्यात येत असून, या प्रकल्पासाठी सुमारे १ हजार २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

रेवस–रेड्डी सागरी महामार्ग हा रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांना सागरीकिनाऱ्यालगत जोडणारा ४९८ किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावर रेवस–करंजा, रेवदंडा, बाणकोट, आगरदांडा, केळशी, कुणकेश्वर आणि जयगड खाडीवर एकूण सात पूल उभारण्यात येत आहेत. त्यामुळे किनारपट्टी भागातील वाहतूक अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.

सध्या चौल व रेवदंडा परिसरात पुलाचे खांब उभारण्याचे काम सुरू असून, प्रकल्प २०२८ अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पूल पूर्ण झाल्यानंतर अलिबाग, रेवदंडा, मुरूड तसेच परिसरातील गावांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, पर्यटन, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक व्यापारालाही मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे कोकणातील आर्थिक विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रेवदंडा खाडीवरील पूल पूर्ण झाल्यानंतर सध्या वळसा घालून करावा लागणारा प्रवास कमी होईल. अलिबाग, रेवदंडा आणि मुरूडदरम्यानची संपर्क व्यवस्था अधिक सुलभ होऊन नागरिकांचा वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे. सागरी महामार्गामुळे समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे आणि मत्स्य व्यवसाय केंद्रांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे होणार आहे. परिणामी पर्यटनवाढीसह स्थानिक व्यापार, रोजगारनिर्मिती आणि गुंतवणुकीच्या संधींमध्येही वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# पढवण गावातच विकासाचा बोजवारा, जनतेत तीव्र संताप

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यात गेली अनेक वर्षे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर एकछत्री अंमल गाजवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पोकळ विकास आता चव्हाट्यावर आला आहे. संपूर्ण तालुक्यात निर्विवाद वर्चस्व असल्याच्या फुशारक्या मारणाऱ्या सत्ताधाऱ्यांची अब्रू त्यांच्याच तालुकाध्यक्षांच्या गावात वेशीवर टांगली गेली आहे.

पढवण गावातील रस्त्याची झालेली चाळण आणि मागच्या पावसाळ्यात वाहून गेलेला पूल आजही जैसे थे असल्याने, स्वतःच्या घरात उजेड करता येत नाही, हे काय तालुक्याचा विकास करणार? अशी बोचरी चर्चा आता तालुक्याच्या कानाकोपऱ्यात सुरू झाली आहे.

पढवण गावाबाहेर असलेल्या नदीवरील पूल मागच्या पावसाळ्यात वाहून गेला. त्याला आता वर्ष उलटून गेले, तरीही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला या पुलाची साधी डागडुजी करण्याचे सौजन्य दाखवता आलेले नाही. तालुकाध्यक्षांचे गाव असूनही जर ही परिस्थिती असेल, तर सामान्य जनतेने न्याय कोणाकडे मागायचा? नेते निवडणुकीपुरते पाय धुवून गावात येतात आणि निवडून आल्यावर मुंबई–अलिबागमध्ये एसी गाड्यांमधून फिरतात, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

या गंभीर समस्येमुळे तळा तालुक्यातील गावागावांत, चहाच्या टपऱ्यांवर आणि नाक्यानाक्यांवर सत्ताधाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्वतःच्या गावचा रस्ता आणि पूल नीट करता येत नाही, हे कसले नेतृत्व? अशा नेत्यांना पक्षात पदे मिळतातच कशी? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये १०० टक्के जागा राष्ट्रवादीच्या निवडून आल्यावरही मत मागताना वाघ आणि विकास करताना शेळी अशीच अवस्था दिसत असून, मग हा सगळा निधी जातो कुठे? की फक्त नेत्यांचेच खिसे भरले जात आहेत? असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत. तसेच, पावसाळ्यात पूल नसल्यामुळे एखादी गंभीर वैद्यकीय आणीबाणी आली तर याला जबाबदार कोण? नाना भौड की त्यांचे वरिष्ठ नेते? असा टोकदार प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे.

## ओरीयन मॉलमध्ये रक्तदान शिबीर

**पनवेल :** दरवर्षी ऊन्हाळ्यात रक्ताचा भयानक तुटवडा जाणवत असतो, सरकारनेही या वेळी रक्तदान शिबीरे आयोजीत करा असे आहवान केले आहे. याला प्रतिसाद देत ग्रुप आणि ओरीयन मॉलच्या वेळेदरम्यान गेली दोन वर्ष रक्तदान शिबीरे आयोजित करत आहेत. ७ जुन रोजी ओरीयन मॉल येथे सकाळी १० ते संध्याकाळी ७ पर्यंत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ओरीयन मॉलचे मंगेश परुळेकर यांनी पनवेल परिसरातील लोकांना आहवान केले आहे की पनवेल हे हायवे वर वसलेले गाव आहे, पनवेलच्या चारही बाजुने हायवे आहेत आणि यावर होणारा अपघातग्रस्तांना , गाव खेड्यातील गरीब महिला, मुले यांना सतत रक्ताची गरज भासते आणि रक्ताचा सतत तुटवडा जाणवत असतो म्हणुन सर्व पनवेलकरांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एमडी ड्रग्जचा कारखाना उद्ध्वस्त

- महाराष्ट्र पोलिसांचा दणका
- २० कोटींचा मुद्देमाल जप्त

| भाईंदर | प्रतिनिधी |

तेलंगणात सुरू असलेला एमडी हा अमली पदार्थ तयार करण्याचा कारखाना मिरा भाईंदर, वसई विरार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा क्र. ४ ने उद्ध्वस्त केला. या कारवाईत तीन किलो एमडीसह हजारो लिटर रसायन जप्त करण्यात आले असून, त्याची किंमत सुमारे ६ कोटी आहे. पोलिसांनी एप्रिलमध्ये मिरा रोडमधील नयानगर येथे राहणाऱ्या फिरदोस अरबाज कुरेशी हिच्या घरातून एकूण एक किलो ३२४ ग्रॅम वजनाचा एकूण २,६६,१७, २८० रुपये किमतीचा एमडी जप्त केला होता.

पुढील तपासात मिरा रोड तसेच आग्रीपाडा, मालवणी, मनोरी परिसरातून एमडी तयार करण्यासाठी लागणारे रसायन व लॅबचे साहित्य असा एकूण १३.६५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १५ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यातील आरोपी संदीप विरास्वामी नायडू याला खालापूर येथून तर नसिर ऊर्फ बाबा जानिमीया शेख आणि मेहमूद मेहबूब खान यांना २९ मे रोजी हैदराबाद येथून अटक करण्यात आली. अधिक चौकशीत जानिमीया शेख याने तेलंगणात एम डी ड्रग्ज तयार करण्याचा कारखाना उभा केल्याची माहिती मिळाली. धाड टाकून पोलिसांनी तीन किलो एमडी, त्यासाठी लागणारे २,२९३ लिटर रसायन आणि साहित्य असा एकूण ६.२२ कोटी रुपये किमतीचा माल जप्त केला. एकूण २०.७२ कोटी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती आयुक्त निकेत कौशिक यांनी दिली.

पान १ वरून

## राजकारणाला कलाटणी देणारा विजय - जयंत पाटील

निवडणुकीनंतर शेतकरी कामगार पक्षाला एक नवी उर्जा मिळाली आहे. रेवदंडाकरांनी पुनर्जिवीत करण्याचे काम केले आहे. रेवदंड्यातील कायापालट हा शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून झाला आहे. ज्यांना स्वतःचे नाव वाचता येत नाही, तो सरपंच आहे, हे रेवदंडाकरांचे दुर्देव आहे. मात्र आगामी काळात सरपंचदेखील शेकाप महाविकास आघाडीचाच असेल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला. संतोष मोरे यांच्या रुपाने एक चांगला उपसरपंच मिळाला आहे. सतत लढत राहिल्यामुळे आजचा हा ऐतिहासिक विजय पाहावयास मिळाला आहे. हा सन्मान खऱ्या अर्थाने रेवदंडाकरांचा आहे. संतोष मोरे यांच्या रुपाने ही लढाई जावळीच्या वाघाने लढली आहे, असे गौरवोद्गार काढत, निष्ठावंत कार्यकर्ते आपल्या सोबत आहेत. ही फौज घेऊन कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा वेगळ्या उमेदीने कामाला लागायचे आहे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले. तालुक्यात शासकीय निधीची प्रचंड लयलुट सुरु आहे. टक्केवारीशिवाय काम केले जात नाही. हा प्रकार मोडीत काढण्यासाठी रेवदंड्याप्रमाणे निवडणूक लढल्यास तालुक्यामध्ये वेगळ्या पध्दतीने राजकीय वातावरणात बदल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच हा विजय अलिबाग तालुक्यातील राजकारणाला वेगळी कलाटणी देणारा असून या विजयाने नव संजीवनी मिळाली आहे, असे जयंत पाटील यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, तालुका शेतकरी संघटनाचे प्रमुख अनिल पाटील, नवनिर्वाचित उपसरपंच संतोष मोरे आणि ॲड. परेश देशमुख यांनीदेखील मार्गदर्शन केले.

## १२० कोटींची ई-सिगारेट, व्हेप जप्त

त्यामुळे केंद्र सरकारने या उत्पादनांवर बंदी लागू केली होती.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार चीन, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांतून मोठ्या प्रमाणात व्हेप आणि ई–सिगारेटची तस्करी केली जात होती. सीमाशुल्क विभागाची दिशाभूल करण्यासाठी फर्निचर, धातूची उत्पादने किंवा इतर वस्तूंच्या नावाखाली चुकीची माहिती देऊन कंटेनर आयात केले जात होते. बनावट कागदपत्रे तयार करून मालाची नोंद वेगळ्या वस्तूंमध्ये दाखवली जात असल्याचेही उघड झाले आहे.

देशातील विविध बंदरे आणि विमानतळांवर संशयास्पद आयातींवर डीआरआयने विशेष लक्ष केंद्रित केले होते. गुप्त माहितीच्या आधारे अनेक कंटेनरचा मागोवा घेण्यात आला. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासणीत विविध कंपन्या, फ्लेवर्स आणि प्रकारांच्या जवळपास तीन लाख व्हेप आणि ई–सिगारेट जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या मालाची किंमत १२० कोटी रुपयांहून अधिक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

तपासादरम्यान या उत्पादनांची विक्री कॅफे, पानटपऱ्या, गुप्त वितरण केंद्रे आणि ऑनलाइन माध्यमांतून होत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे बंदी असूनही हे व्यसनमूलक उत्पादन सहज उपलब्ध होत असल्याने कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

डीआरआयच्या या कारवाईमुळे व्हेप तस्करीच्या काळ्या साम्राज्याला मोठा धक्का बसला असला तरी देशभरात सुरू असलेल्या या अवैध व्यापाराचे संपूर्ण जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी आणखी कठोर कारवाईची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेषतः तरुण पिढीला व्यसनाच्या विळख्यात अडकविणाऱ्या या घातक व्यापाराविरोधात केंद्र व राज्य यंत्रणांनी संयुक्त मोहीम उभारण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## अनिकेत तटकरे बिनविरोध

नितेश राणे यांच्यासोबत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत उमेदवारी अर्ज मागे घेतला. या धक्कादायक निर्णयामुळे शिवसेना ठाकरे गटाकडून त्यांच्यावर कडक कारवाई करत पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. बाळ माने यांच्या या निर्णयामुळे कोकण विधानपरिषद निवडणूक आता बिनविरोध होणार आहे. त्यांची तत्काळ पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्यानंतर ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी त्यांच्या सोशल मिडीयावरून पोस्ट करत याबाबत माहिती दिली.

## होळीच्या माळावर तात्पुरते रुग्णालय

असणार आहे. सर्व वैद्यकिय पथकांकडे पुरेशा प्रमाणात औषधसाठा व वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देण्यात आला आहे. शिवराज्याभिषेकासाठी किल्ले रायगडावर येणाऱ्या प्रत्येक शिवभक्तांची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून तशी सज्जता आरोग्य विभागाने ठेवली आहे. त्यामुळे शिवभक्तांनी या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनिषा सातपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी केले आहे.

**१५ रुग्णवाहिका सज्ज**

प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड, नाणेदरवाजा, रोपवे पायथा, नानेखिंड, ग्रामीण रुग्णालय महाड व उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे ६ रुग्णवाहिका या उपलब्ध असतील. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड, मागणांव व महाड मार्गावर १०२ क्रमांकांच्या ७ रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. अशा एकुण १५ रुग्णवाहिका कार्यरत राहणार आहेत.

सोहळ्यादरम्यान प्रशासनातर्फे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता तपासण्याकरिता ७ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकाकडून टँकरद्वारे व इतर पाण्याच्या स्त्रोत्रांचे निर्जंतुकीकरण केलेले पाणी उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात येणार आहे.

## जासईत मातीच्या ढिगाऱ्यात मानवी कवटी

आहे की, आता या डोंगरांना खड्डा योजना पुरस्कार देण्याची वेळ आली आहे. निसर्गाचे आणि शेतजमिनींचे कंबरडे मोडून सुरू असलेल्या या व्यवसायातून माणुसकी पुरती गाडली गेली आहे. निसर्गाच्या या पोस्टमॉर्टमच्या बाजारात आता चक्क माणसांची हाडे आणि कवटी बाहेर येऊ लागल्याने परिसरात कमालीची घबराट पसरली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, भर वस्तीत आणि रस्त्याच्या कडेला मानवी शरीराचा भाग सापडूनही स्थानिक महसूल आणि पोलीस प्रशासन कमालीचे शांत आहे. सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना, अधिकारी मात्र कोणतीही हालचाल करायला तयार नाहीत. या ढिम्म कारभारामुळे भरावात माणसाची कवटी सापडते, पण प्रशासनाची कवटी का हलत नाही? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जासई आणि परिसरातून दररोज रात्री अपरात्री आणि दिवसाढवळ्या हजारो डंपर माती चोरून नेली जाते. या अवैध वाहतुकीला राजाश्रय मिळण्यासाठी प्रति डंपर प्रसाद वाटला जात आहे. एवढा मोठा गैरवावर उघड सुरू असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तहसीलदार नेमके कोणाच्या आशीर्वादाने डोळे झाकून बसले आहेत, असा थेट आरोप आता केला जात आहे.

सापडलेली कवटी नेमकी कुठून आली यावरून आता संशयाचे धागे जोडले जात आहेत. मातीचा भराव मुंबईतील एखाद्या जुन्या पुलाच्या डेब्रिज कामातून आणला आहे की, स्थानिक डोंगरातून? आज कवटी सापडली उद्या मृतदेह सापडण्याची पण भीती व्यक्त होत आहे. हा प्रकार केवळ पर्यावरणाचा ऱ्हास नसून गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याने पोलीस व तहसीलदारांनी मूग गिळून गप्प न बसता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवावा आणि ती कवटी कोणाची आहे? याचा छडा लावावा, अशी मागणी आता जनतेतून केली जात आहे.

## केरळात मान्सून दाखल

लप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांचा समावेश होता. राज्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, पत्तनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूर जिल्ह्यात पावसाच्या सौम्य ते मध्यम सरी कोसळण्याचा अंदाज आहे. केरळसह तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक जिल्ह्यात पुढील ७ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळच्या अनेक भागात आधीच जोरदार पाऊस सुरू आहे. ओडिशा, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, दिल्ली, तेलंगणासह २४ राज्यांमध्ये पाऊस आणि वेगवान वारे वाहतील असं हवामान खात्याने सतर्क केले आहे. हवामानातील बदलामुळे आजही गुजरात, पश्चिम राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान ४० डिग्री सेल्सिअसपुढे आहे.

**महाराष्ट्रात मान्सून कधी येणार?**

महाराष्ट्रात पुढील २ दिवसांत मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे. ६ ते ७ तारखेला मान्सून तळ कोकणात दाखल होईल. त्यानंतर मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह इतर भागात पावसाला सुरुवात होईल. दरम्यान, भीषण उष्णतेने हैराण झालेल्या भारतातील उत्तर पश्चिम राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनाने दिलासा मिळाला आहे. ३० जूनपर्यंत मान्सून संपूर्ण देशाला व्यापेल, असं भारतीय हवामान खात्याने सांगितले आहे. राजधानी दिल्लीपर्यंत मान्सून पोहचण्यासाठी २५ ते ३० जून कालावधी लागू शकतो. उत्तर प्रदेशात मान्सून १५ जूनच्या आसपास दाखल होऊ शकतो.

## नवी मुंबई विमानतळावर ‘हल्ल्याचा थरार’

अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे काही काळ संपूर्ण परिसर युद्धजन्य परिस्थितीचा अनुभव देत होता.दरम्यान, सीआयएसएफच्या जवानांनी अतिशय वेगवान हालचाली, अचूक नियोजन आणि उत्कृष्ट समन्वयाचे प्रदर्शन केले. संभाव्य धोक्याची माहिती मिळताच जवानांनी काही मिनिटांत परिसर ताब्यात घेत संशयितांना निष्प्रभ करण्याची कार्यपद्धती प्रत्यक्ष सरावातून दाखवून दिली. विमानतळावरील प्रवासी, कर्मचारी आणि महत्त्वाच्या सुविधांचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा यंत्रणा किती सक्षम आहे, याची झलक या सरावातून पाहायला मिळाली. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या मॉकड्रिल अत्यंत आवश्यक आहेत. विमानतळ हे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे केंद्र असल्याने कोणत्याही संकटाला तातडीने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी सातत्याने सराव केला जातो.

या मोहिमेपूर्वी नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरही सीआयएसएफच्या नेतृत्वाखाली दहशतवादविरोधी सराव मोहीम पार पडली होती. एव्हिएशन सिक्युरिटी ग्रुप दिल्लीचे डेप्युटी इन्स्पेक्टर जनेरल आणि चीफ एअरपोर्ट सिक्युरिटी ऑफिसर यांच्या थेट देखरेखीखाली हा सराव करण्यात आला होता. विशेष म्हणजे या मॉक ड्रिलमध्ये केवळ सीआयएसएफच नव्हे तर दिल्ली पोलीस, राष्ट्रीय सुरक्षा रक्षक (एनएसजी), बॉम्ब शोधक व नाशक पथक, अग्निशमन दल, विमानतळ सुरक्षा विभाग, विमानतळ प्राधिकरण आणि इतर संबंधित यंत्रणांनीही सहभाग घेतला.

विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय, संवाद व्यवस्था आणि संकट काळातील निर्णयक्षमता यांचीही या सरावातून चाचणी घेण्यात आली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना अशा प्रकारच्या सुरक्षा सराव मोहिमांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कोणत्याही दहशतवादी कारवाया, घुसखोरी किंवा सुरक्षा धोक्यांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सज्ज असल्याचा संदेश या मॉक ड्रिलमधून देण्यात आला. विमानतळ सुरक्षा ही केवळ बंदुका आणि जवानांपुरती मर्यादित नसून विविध यंत्रणांमधील समन्वय, तांत्रिक सज्जता आणि तत्पर प्रतिसाद यावर अवलंबून असते. नवी मुंबई विमानतळावर पार पडलेल्या या थरारक सराव मोहिमेने सुरक्षा यंत्रणांची तयारी आणि क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

## गुंड सचिन घायवळला अटक

हादरा बसल्याचे म्हटले जात आहे. सचिनला राजस्थानातील सिकर जिल्ह्यातून अटक केली आहे. सचिन याच्या विरोधात खंडणी, हत्या, हत्येचा प्रयत्न, धमक्या देणे असे अनेक गुन्हे दाखल आहेत. सचिन अनेक महिन्यांपासून फरार होता. सचिन याच्या विरोधात ४४ लाख ३६ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा आरोप आहे.

**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY’S,**
**ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE,**
**VESHVI–ALIBAG – 201 209.**
**(UnAided)**

**WALK-IN-INTERVIEW**

The walk-in-interview are arranged at Head Office of the PNP Education Society, Veshvi -Alibag on **09/06/2026** at **11.00 a.m.** to fill up the following posts of teachers on purely temporary and contract basis.

| Sr. No. | Name of the subject | No. of Posts |
|---|---|---|
| 1 | Marathi | 02 |
| 2 | Hindi | 02 |
| 3 | History | 02 |
| 4 | Economics | 01 |
| 5 | English | 01 |
| 6 | Geography | 02 |
| 7 | Commerce & A/C | 02 |
| 8 | Chemistry | 08 |
| 9 | Physics | 02 |
| 10 | Botany | 02 |
| 11 | Microbiology | 01 |
| 12 | Mathematics | 01 |
| 13 | Zoology | 01 |
| 14 | Computer Science | 06 |
| 15 | Business Law | 01 |
| 16 | Librarian | 01 |

Educational Qualifications as per the norms of University of Mumbai, Post graduate in concern subject with NET/SET or Ph.D. for Senior College and as per the Department of Education, Govt. of Maharashtra.

**Instructions**
- NoT.A./D.A.will be paid for attending the interview.
- Bring the attested Xerox copies of all the academic documents and original documents along with the application.
- Final recruitment will be based on available workload of the respective subject.
- If reserve category candidate is not available, open category candidate may be considered.

**Place** : **Head Office of the PNP Education Society,Veshvi,Alibag- Raigad.**
**Date of Interview** : **09 June 2026.**
**Reporting Time** : **10:30 a.m.**

**Sd/-**
**(Mrs. Chitralekha N. Patil)**
**SECRETARY.**
**PNP Education Society, Veshvi-Alibag.**



# रेवदंड्यात विजयाचा जल्लोष

## उपसरपंच संतोष मोरे यांची विजयी मिरवणूक

## जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रेवदंडा ग्रामपंचायतीवर शिंदे गटाची सत्ता असतानाही शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष मोरे यांची उपसरपंच म्हणून बहुमतांनी निवड झाली. त्या निमित्ताने रेवदंड्यामध्ये शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. रेवदंडा येथील पारनाका ते संतोष मोरे यांच्या निवासस्थानापर्यंत मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, जि.प. माजी सदस्य तथा शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य तथा माजी शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, शेतकरी संघटनेचे तालुका प्रमुख अनिल गोमा पाटील, दादा मोरे, सुरेश खोत, शरद वरसोलकर, निलेश खोत, निलेश गाडे, रेवदंड्याच्या माजी सरपंच सोनाली मोरे, ॲड. परेश देशमुख, दत्ता ढवळे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, दिपक पाटील, कृउबा समितीचे अध्यक्ष अनंत पाटील, सुरेंद्र नागलेकर, शुभांगी कोंडे, मनिषा चुनेकर, खलिल तांडेल, प्रमोद (बाळू) नवखारकर, अशोक नाईक, संगिता पाटील, विजय चौलकर, संदीप खोत, हेमंत पाटील, अशिष पाटील, दर्पण चौलकर, अनिल बाईट, सलीम गोंडेकर, शरद पाटील, राजू चुनेकर, दिलीप धुमाळ, कृष्णा गायकर, सुशील सुर्वे, संजय पाटील, शेकाप व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेवदंडा ग्रामपंचायतीच्या शिंदे गटातील उपसरपंच मंदा बळी यांचे अतिक्रमण बांधकामप्रकरणी उपसरपंच पद आणि दिक्षा बळी यांचे सदस्यत्व रद्द झाले होते. त्यामुळे ही जागा रिक्त होती. मंगळवारी (दि.२) उपसरपंचपदाची निवडणूक झाली. या निवडणूकीत गुप्त मतदान प्रक्रीयेत शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष मोरे यांना ९ मते मिळाली. त्यामुळे शिंदे गट महायुतीचे उमेदवार सुराराम माळी यांचा दारूण पराभव झाला. विरोधकांची सत्ता असतानाही या निवडणूकीत शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष सदाशिव मोरे यांना बहुमत मिळाले. या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष गुरुवारी (दि.४) रेवदंड्यामध्ये साजरा करण्यात आला.

सुरुवातीला रेवदंडा पारनाका येथील श्री हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेण्यात आले. त्यानंतर विजयाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ''शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडीचा विजय असो'', अशा घोषणा देण्यात आल्या. फटाकांच्या आतषबाजीबरोबरच वाद्याने संपुर्ण रेवदंडा परिसर दुमदुमून गेला. या मिरवणूकीत अनेकांनी नृत्य देखील केले. ज्येष्ठ कार्यकर्ते, महिला, तरुण मंडळी या मिरवणूकीत उत्स्फुर्तपणे सहभागी झाली होती. संतोष मोरे यांच्या घरापर्यंत काढण्यात आलेल्या या मिरवणुकीच्या क्षणाचे छायाचित्र अनेकांनी आपल्या मोबाईलमध्ये काढले. काहींनी सेल्फीचा आनंद लुटला. संतोष मोरे यांच्या घराजवळ मिरवणूक पोहचल्यावर शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक तसेच नवनिर्वाचित उपसरपंच संतोष मोरे यांचे औक्षण करण्यात आले. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन संतोष मोरे यांचे अभिनंदन करण्यात आले.













# सुरेश घरत यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

। रायगड। जिल्हा प्रतिनिधी।

शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा वाढदिवस गुरुवारी (दि.४) अलिबाग तालुक्यातील वरसोलीमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने वरसोली येथील खंडोबा मंदिराच्या सभागृहात रक्तदान आणि मोफत नेत्र चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराला रक्तदात्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.



सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा

शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्याने, लायन्स क्लब अलिबाग व रक्तबंध सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने रक्तदान व नेत्रतपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चिकित्सा शिबीर हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख तथा लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, माजी नगरसेवक संजना कीर, मच्छिमार सोसायटीचे चेअरमन धर्मा घारबट, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष भोबू, अविनाश राऊळ, महेश कवळे, संजू माळी, विकास घरत, संदीप जगे, डॉ. गोसावी, डॉ. शुभदा कुडतडकर, रक्तबंध संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, सीएफटीआयचे कर्मचारी आदी मान्यवरांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, शेकाप कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरेश घरत यांचा वाढदिवस खंडोबा मंदिराच्या सभागृहात करण्यात आला. यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. सकाळपासून सुरु झालेल्या शिबीराला नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. १८० जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले. यावेळी अनेकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर रुग्णांना मोफत चष्मेदेखील वाटप करण्यात आले.

### ''सुरेश घरत म्हणजे जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे नेतृत्व''

सुरेश घरत यांच्यासारखे कर्तृत्ववान कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात असणे ही एक अभिमानाची गोष्ट आहे. राजकीय, सामाजिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान राहिले असून, ते खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी सुरेश घरत यांच्यावर तालुका चिटणीस म्हणून जबाबदारी दिली. ती जबाबदारी ते समर्थपणे आणि सक्षमपणे सांभाळत आहेत. सर्वसामान्यांचे वेगवेगळे प्रश्न सोडविण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा आहे. भविष्यात त्यांचे व्यक्तीमत्व व्यापक स्वरुपात असल्याचे पहावायस मिळणार आहे. सुरेश घरत यांना शेकापसह पाटील कुटूंबियांचा पाठींबा आणि सहकार्य कायम असेल, असा विश्वास शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

# श्रीवर्धनमध्ये पर्यटकांच्या गाड्या रस्त्यावर

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहरात वाढते पर्यटन या दृष्टीने अनेकांनी आपापल्या जागेत रिसॉर्ट, हॉटेल्स, होमस्टे उभारली आहेत.परंतु, काही व्यावसायिकांनी स्वतःच्या जागेत वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था न केल्याने आलेले पर्यटक हे आपली वाहने रस्त्याच्या कडेला उभी करताना दिसतात. या कारणाने रस्त्यांवर वाहतूक कोंडी समस्या निर्माण होऊ लागली आहे.

सध्या सुट्ट्यांच्या हंगाम सुरू असून, पर्यटक एखाद दोन दिवसांच्या मुक्कामासाठी श्रीवर्धनकडे येत आहेत.अनेक रिसॉर्ट, रेस्टॉरंट चालकांनी येणाऱ्या पर्यटकांच्या गाड्यांच्या पार्किंग करीता जागेची व्यवस्था केली नसल्याने पर्यटक रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करताना दिसतात. अरुंद रस्ते आणि त्यात गाड्यांमुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन वादविवादाच्या घटना घडल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा अग्निशामक दलाची गाडी अडकून पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिकांनी या समस्येबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, नगरपरिषद आणि पोलिसांनी यावर तोडगा काढावा, अशी मागणी केली आहे. ज्या व्यावसायिकांनी स्वतःच्या जागेत पार्किंग व्यवस्था केली नाही त्यांना दंड करण्यात यावा, अशा प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. त्यामुळे प्रशासन या वाढत्या त्रासातून श्रीवर्धनकरांची कधी सुटका करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



> श्रीवर्धन हे एक पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे पर्यटकांचा वाढता ओघ हे स्वाभाविक आहे. सद्यस्थितीत श्रीवर्धन मध्ये पार्किंगची सोय उपलब्ध नाही. लवकरच पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. स्थानिक जनतेला पर्यटकांच्या गाड्यांचा कोणताही त्रास होऊ नये यासाठी देखील उपाययोजना केल्या जातील.
>
> – ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन

# जिल्हाधिकारी कार्यालयाचे कारवाईचे आदेश

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान हे इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर असून, या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नवीन विकासकामे करण्यास बंदी आहे. मात्र, तरीही बेबी डिसुझा रस्त्यावर सुरू असलेल्या बांधकामांबाबत आता रायगड जिल्हाधिकारी यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

माथेरानमध्ये पुन्हा एकदा अनधिकृत विकास कामांवरून वाद निर्माण झाला आहे. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आलेल्या माथेरानमध्ये नियमांची पायमल्ली होत असल्याचे दिसून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने २००३ साली माथेरान नगरपरिषद क्षेत्राला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केले होते. त्यानंतर या भागात कोणतेही विकासकाम करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार माथेरान सनियंत्रण समितीची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, शहरातील बेबी डिसुझा मार्गावर काही खाजगी मालमत्ताधारकांकडून दगडी-मातीच्या रस्त्याचे नियमबाह्य उत्खनन सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या कामासाठी नगरपरिषद किंवा सनियंत्रण समितीची कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आल्याचे समोर आलेले नाही. त्यामुळे हे काम सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करत असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी माथेरान नगरपरिषद आपल्या मालकीच्या रस्त्यावरून एका खासगी जागेकडे नवीन रस्ता तयार करून देत असल्याची बाब विरोधी पक्षाचे नेते सीताराम कुंभार यांच्या निदर्शनास आली होती. त्यानंतर त्यांनी या कामाविरोधात रायगड जिल्हाधिकारी आणि माथेरान पालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

# केंद्र सरकारची संभ्रमात टाकणारी भूमिका

- राजमाची घोषित अभयारण्य
- तरीही टोरंट प्रकल्पाला मंजुरी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्याचा विस्तार करताना पुणे जिल्ह्यातील राजमाची परिसराला २०२१ मध्ये केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाने संवर्धित क्षेत्र जाहीर केले आहे. मात्र, हाच संवर्धित भाग केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अखत्यारीत असताना देखील टोरंट कंपनीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, वन विभागाची संवर्धन केली जाणारी अभयारण्य क्षेत्रातील जमीन वन विभाग टोरंट सारख्या खासगी प्रकल्पाला देऊ शकते का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे केंद्र सरकारची हि भूमिका संभ्रमात टाकणारी असल्याचे बोलले जात आहे.

पश्चिम घाट असलेल्या सह्याद्रीच्या पर्वत रांगेत माथेरान येथे इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर करण्यात आला. त्यानंतर रायगड, ठाणे आणि पुणे जिल्ह्याच्या भागाला भीमाशंकर आणि रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्य क्षेत्र केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने जाहीर करून त्या भागातील वनाचे संवर्धन करण्याचा निर्णय घेतला. त्यातील भीमाशंकर अभयारण्य भागाच्या वाढीव क्षेत्राची घोषणा केंद्र सरकारने २०२१ मध्ये केली. त्यात रायगड जिल्ह्यातील कर्जत आणि पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील भागाचा समावेश असलेली राजमाची भागाचा अभयारण्यामध्ये समावेश झाला. त्यामुळे राजमाची डोंगर आणि



आजबाजूच्या पट्ट्यातील २००० एकर जमिनीवरील जंगलाचे संवर्धन करण्याचे जाहीर केले. २०२१ मध्ये अभयारण्य म्हणून जाहीर केलेले राजमाची क्षेत्र टोरंट या खासगी कंपनीला वीज निर्मितीसाठी बक्षीस देऊन टाकले आहे. त्यामुळे टोरंट कंपनी नक्की कोणाची, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. त्यामुळे उद्या संपूर्ण कर्जत तालुका टोरंट कंपनीचा होणार का? असा प्रश्न पडला आहे.

# महागाईविरोधात महाविकास आघाडीचा एल्गार



। उरण । प्रतिनिधी ।

पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीने वाहनचालकांचे कंबरडे मोडले आहे. घरगुती गॅसने स्वयंपाकघराचे बजेट उद्ध्वस्त केले आहे. दूध, धान्य, भाजीपाला, खाद्यतेल आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत. सोने-चांदी सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेले आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य जनतेचा श्वास गुदमरू लागला असताना सरकार मात्र सुस्तपणे तमाशा पाहत असल्याचा आरोप करीत, मविआच्यावतीने उरणमध्ये जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ. मनिष पाटील, सभापती महेश म्हात्रे, नगराध्यक्षा भावना घाणेकर, उपसभापती परेश पाटील, शेकाप तालुका चिटणीस रवी घरत, नरेश रहाळकर, संतोष ठाकूर, विनोद म्हात्रे, ममता पाटील, नगरसेविका नाहीदा ठाकूर, प्रार्थना म्हात्रे, वंदना पवार, जि.प. सदस्या प्रेरणा पाटील, पं.स. सदस्य दीपक भोईर, कमलाकर पाटील, नरेश घरत, अविनाश म्हात्रे, रुपेश पाटील, आदी सहभागी झाले होते.

# बंगालमधील बगावत

बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपला २९४ पैकी तब्बल २०७ म्हणजे दोनतृतियांश जागा मिळाल्या. तिथे तीन वेळा सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसचे आमदार केवळ ८० आहेत. ही संख्या भाजपसाठी अजिबात आव्हानात्मक नाही. पण भाजप आपल्या प्रतिस्पर्ध्यांना जगू देत नाही. त्यांना शत्रू समजून पूर्ण निःपात करणे हेच त्याचे ध्येय असते. महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष भाजपला अडचणीत आणू शकतील असे होते. त्यांच्यात फूट पाडून त्यांचा शक्तिपात घडवण्यात आला. महाराष्ट्रात सत्ता मिळवण्यासाठी शिवसेना फोडण्यात आली. पण नंतर संख्याबळाची काहीही गरज नसताना शरद पवारांचा पक्ष फोडण्यात आला. तोच प्रयोग बंगालमध्ये चालू झालेला दिसतो. तृणमूल काँग्रेसमध्ये फूट उभी फूट पडली आहे. बंडखोरांच्या फुग्यामध्ये हवा भरली गेली आहे. त्यांच्या मागे अक्षरशः रातोरात ५८ आमदार उभे राहिले आहेत. कोणत्याही पक्षातील फूट अधिकृत होण्यासाठी दोनतृतियांश आमदार फुटावे लागतात. ती संख्या पार झाली आहे. विधानसभेचे अध्यक्ष भाजपचेच आहेत. त्यांना पत्र देताच त्यांनी तात्काळ नव्या गटाला मान्यता देऊन टाकली. त्यांना मूळ पक्ष म्हणून ओळखले व पक्षचिन्हही त्यांच्याकडे राहील असे संकेत दिले. वास्तविक कोणता गट मूळ व पक्षचिन्ह कोणाचे हे ठरवण्याचे अधिकार विधानसभा अध्यक्षांना नाहीत. ते निवडणूक आयोगाला आहेत. पण भाजपच्या राज्यात सगळे संकेत, नियम, कायदे धाब्यावर आहेत. महाराष्ट्राच्या प्रकरणात तर खुद्द सर्वोच्च न्यायालयानेही कोश्यारींचा निर्णय बेकायदा आहे, पण आता तो रद्द करता येत नाही अशी अजब भूमिका घेतली. बंगालबाबत हेच होऊ शकते. एकूण, वरवर पाहता तृणमूल काँग्रेसमधील असंतोषामुळे आमदार फुटले असे वाटत असले तरी त्यांना भाजपकडून भरपूर फूस व रसद मिळते आहे व यापुढेही मिळत राहणार आहे. भाजप सत्ता मिळवण्यासाठीच नव्हे तर अत्यंत मजबूत स्थितीत असतानाही विरोधी पक्षांना संपवण्यासाठी वाट्टेल तरी कुटील कारस्थाने करू शकतो याचे आणखी एक उदाहरण बंगालच्या रुपाने पुढे आले आहे.

## निष्ठेची फसवी नाटके

अर्थात, तृणमूल काँग्रेस पक्ष ज्या रीतीने चालवला जात होता त्यामुळे बंडखोरीसाठी भुसभुशीत जमीन तयार झाली हे विसरून चालणार नाही. ममता बॅनर्जी या मुळातल्या काँग्रेसच्या फायरब्रँड नेत्या होत्या. राजीव गांधी यांच्या कट्टर समर्थक होत्या. पण त्यांच्यानंतर नव्या नेतृत्वाशी न जमल्याने त्यांनी स्वतःचा पक्ष काढला. बंगालमध्ये तेव्हा कम्युनिस्टांची सत्तेवर जबर पकड होती. तिच्या विरोधात ममता यांनी रस्त्यावरच्या लढाया केल्या. ३५ वर्षे सत्तेत राहिल्याने कम्युनिस्टांविरुध्द नाराजी तयार झाली होती. तिचा ममतांना फायदा झाला. त्यांची चिकाटीही जबर होती. त्यामुळेच सर्व पक्ष त्यांच्याभोवती उभा राहिला. पुढे तीन वेळा त्यांनी सत्ता मिळवली. २०२१ मध्ये तर त्यांनी आधीपेक्षा जास्त जागा मिळवून भाजपचे आव्हान परतवून लावले. त्यामुळे त्यांच्याभोवती मोठे वलय तयार झाले. हम करेसो कायदा ही प्रवृत्ती बळावली. आपला भाचा अभिषेक बॅनर्जी याला त्यांनी पुढे आणले. अभिषेक यांची संसदेतील भाषणे चांगली होती. त्यांनी संघटनेवरही चांगली पकड मिळवली. पण ते करताना त्यांनी बहुदा अनेकांना दुखावले असे दिसते. कारण नव्या गटाने मुख्यतः अभिषेक यांच्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. अभिषेक हे अत्यंत उर्मटपणे वागत होते असा फुटीर गटाचा आरोप आहे. आजवर सत्ता असल्याने ही नाराजी व्यक्त होत नव्हती. पण आपल्या सध्याच्या संसदीय प्रणालीमध्ये निष्ठा, विचारांबाबतचा प्रामाणिकपणा ही मूल्ये संपली आहेत. सर्व जण रोकड्या व्यवहाराची भाषा करू लागले आहेत. पक्ष आणि पक्षाचा नेता जोवर निवडणूक जिंकून देऊ शकतो तोवरच खालचे लोक त्याच्याशी निष्ठा वगैरेचे नाटक करतात. नेत्याची ही क्षमता संपली की कोणीही ऐरेगैरे त्याला आव्हान देऊ लागतात. कालपर्यंत नेत्याचे जोडे उचलायला तयार असणारे आज लगेच त्याच्यावरच जोडे उगारायला कमी करत नाहीत. तृणमूलमध्ये हेच घडले. अभिषेक बॅनर्जी हे केवळ निमित्त आहेत. प्रत्यक्षात ममता बॅनर्जी या भाजपविरुध्द आपल्याला जिंकून देण्यास पुरेशा नाहीत हे फुटीरांच्या लक्षात आले आहे. शिवाय त्यांना गेली १५ वर्षे सत्तेत राहण्याची सवय झाली आहे.

## म्हणे, ममता मार्गदर्शक

तृणमूल आणि भाजपचे आजवर हाडवैर होते. तृणमूल काँग्रेसला नष्ट करूनच भाजप वाढला आहे व पुढेही वाढणार आहे. तृणमूलचे नेते स्वतःला सेक्यूलर म्हणवतात. जातीयवादाला त्यांचा विरोध आहे. बंगालमध्ये यंदा मुस्लिमद्वेषाची मोहीम चालवण्यासाठी भाजपने नाना कारस्थाने केली. निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतदारयाद्यांमधून वेचून वेचून मुस्लिम मतदारांना वगळण्यात आले. वगळण्यात आलेले सर्व मुस्लिम हे बेकायदा नागरिक किंवा घुसखोर बांगलादेशी आहेत असा प्रचार करण्यात आला. तृणमूल काँग्रेसने याविरुध्द ठाम भूमिका घेतली होती. ती केवळ मुस्लिम मते मिळवण्यापुरती नसावी अशी अपेक्षा होती व आहे. भाजपचे धर्मांध राजकारण हाणून पाडण्यासाठी उभ्या राहिलेल्या इंडिया आघाडीचा तृणमूल हा महत्वाचा घटक आहे. अशा स्थितीत त्याच पक्षाच्या एका गटाने एका निवडणुकीतील पराभवानंतर लगेचच भाजपशी चुंबाचुंबी सुरू करावी हे अत्यंत धक्कादायक आहे. त्याहूनही धक्कादायक बाब अशी की, याचे नेते ऋतब्रत बॅनर्जी हे एकेकाळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आश्वासक युवा नेते होते. त्यांच्या स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे ते आठ वर्षे राष्ट्रीय सचिव होते. सीताराम येचुरी यांनी त्यांना पुढे आणले होते व माजी मुख्यमंत्री बुध्ददेव भट्टाचार्य यांच्या खास मर्जीतील होते. ऋतब्रत यांचा एपल फोनचा वापर, प्रमोद महाजनांसारखी जीवनशैली यामुळे वादंग झाले व त्यांना पक्षातून बाहेर करण्यात आले. तेथून ते तृणमूलमध्ये आले. त्यांना ममता यांनी राज्यसभेचे खासदार केले. म्हणजे अगदी तरुण वयात त्यांना दोन्ही पक्षांनी भरपूर काही दिले. तरीही डाव्या व सेक्यूलर विचारांच्या मांडवाखालचा हा नेता आता भाजपशी हस्तांदोलन करतो आहे. ममता बॅनर्जी यांनी शोभनदेव चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेते करावे असे पत्र विधानसभा अध्यक्षांकडे दिले होते. त्यावरील अनेक आमदारांच्या सह्या बनावट आहेत असा गवगवा करून बॅनर्जी यांनी पहिले बंड केले. त्यापूर्वी त्यांनी दोनच दिवस आधी दिल्लीत भाजपचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांची भेट घेतली होती. त्यामुळे यामागचा कावा लक्षात यावा. ममता यांनी या प्रकरणी ऋतब्रत आणि संदीपान सहा यांना हाकलल्यानंतर त्यांच्याभोवती तात्काळ साठच्या आसपास आमदार गोळा होतात हे आश्चर्यकारक आहे. फुटीर गटाने विधानसभा अध्यक्षांना जे पत्र दिले आहे त्यावर ममता बॅनर्जी या आमच्या प्रमुख परामर्शदाता किंवा मार्गदर्शक आहेत असे म्हटले आहे. कालपर्यंत ज्या ममतांसमोर बोलण्याची ज्यांची हिंमत नव्हती ते आता ममतांना खुलेआम रिटायर करू पाहत आहेत. यापूर्वी महाराष्ट्रात अजितदादांनी शरद पवारांना असेच जाहीरपणे आता घरी बसा असा सल्ला दिला होता. पण शरद पवारांनी त्यानंतर २०१९ व २४ च्या निवडणुकांमध्ये आपली ताकद दाखवली होती. ममतादेखील पुन्हा उसळून उठतील यात अजिबात शंका नाही.

विचार

# ज्ञानेश्वरी : पर्यावरणाचे तत्वज्ञान

विठ्ठल वळसे पाटील

संत ज्ञानेश्वर महाराज रचीत ज्ञानेश्वरी ग्रंथ हा निसर्ग व विज्ञान यांचा संगम दर्शविणारा आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथात निसर्ग, पर्यावरण किंवा विज्ञान असे शब्द येत नसले तरी त्यात जीवसृष्टी किंवा भूतदृष्टी तून निसर्ग संवेदन विचार मांडला आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथात ओवी ओवीतून निसर्गाचे दर्शन घडताना वैज्ञानिक दृष्टीकोन व पारमार्थिक तत्वज्ञान मांडले आहे.

**आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें ।**
**जैसे न चलतां सूर्याचें चालणें ।**
**तैसें नैष्कर्म्यत्व जाणे । कर्मीचि असतां ।।**

सजीव सृष्टीसाठी सूर्य व त्याचा प्रकाश किती महत्वाचा आहे हे आपण जाणतो. विज्ञान १५ व्या शतकानंतर प्रगत होवू लागले, परंतु ७०० वर्षापूर्वी ज्ञानेश्वरांनी सूर्याचा खगोल शास्त्रीय सिद्धांत सांगितला आहे. सूर्याचा उदय व अस्त होतो, या प्रमाणांनुसार तो फिरताना भासतो. सूर्य स्थीर असून पृथ्वी त्याचे भोवती फिरते हे वैज्ञानिक सत्य मांडणारी ओवी आहे. त्यातील आध्यात्मिक विचार नैष्कर्म्यत्व म्हणजे कर्म करताना ते मी करत नाही ही भावना पूर्णता नाहीशी होते.

**मग तया उदकाचेनि आवेशें ।**
**प्रगटलें तेज जें लखलखीत दिसे ।**
**तिये विजूमाजीं असे । सलिल कायी ।।**

पाण्याच्या घर्षणातून जलविद्युत निर्माण होते हा विजेचा शोध दोनशे वर्षापूर्वीचा होय. पाण्याचे जोरात घर्षण झाले की वीज तयार होते. ओवीचा अर्थ असा आहे की, जेव्हा पाण्यातून वीज चमकते, तेव्हा त्या विजेमध्ये पाणी असते का? वर वर विकार जरी दिसत असले तरी, मूळ ईश्वररुपी हा आत्मा विकार रहित असतो. हे अध्यात्माच्या दृष्टीने त्या पुढील ओवीत सांगितले आहे.

**वसंत तेथें वने । वन तेथें सुमने ।**
**सुमनी पालिंगणे । सारगांची ।।**

जेथे वसंत फुलला आहे तेथे झाडांना नवी पालवी येते नवी पालवी आली की तिथे फुले, फळे, व भ्रमर भुंगे असावयाचेच. या ओवीतून संत ज्ञानेश्वरांनी निसर्गाचा नियम सांगितला आहे. याचे प्रमाणे मानवी जीवन चक्र असते. आजची परिस्थिती देशात दरवर्षी हजारे हेक्टर जंगल नष्ट होत आहे. त्यामुळे सध्या जगात अनेक ठिकाणी मानव निर्मित जंगल उभे केले जात आहे.

**नातरी उद्यानी माधवी घडे।**
**तेथ वन शोभेची खाणी उघडे।**
**आदिलापासौनि अपाडे । जियापरी ।।**

वसंताचे आगमन होता उद्यानात वनसेवेची खाणच उघडते लहान मोठ्या वृक्षापर्यंत सार काही सौंदर्याने फुललेले असते. या ओवीतून निसर्गाचे रुप मांडले असे तरी अगोदरच्या ओवी मध्ये वनात होणारा वसंताचा प्रवेश होतो, तसा देहात होणारा तारुण्याचा प्रवेश या दोनही गोष्टी नितांत सुंदरता प्रदान करतात. निसर्गातील घडामोडी या मानवी जीवनाशी साधर्म्य दर्शवते हे ज्ञानेश्वरीच्या पानोपानी जाणवते.

**नगरेची रचावी । जलाशये निर्मावी ।**
**महावने लावावी । नानाविध ।।**

निसर्गाच्या संरक्षणाचे आणि पर्यावरणाच्या संतुलनाचे महत्व सांगणारी ओवी गावे, नगर, शहरे यांची निर्मिती करावी त्यासाठी जलाशये तलाव, विहिरी असे पाण्याचे साठे तयार केले पाहिजे. निसर्गाचा समतोल राखण्यास जंगल वने निर्माण केली पाहजे. नानाविधे म्हणजे अनेक प्रकारची. आज अनेक शहरांना पाणी व शहरात झाडे यांचा नियोजन अभावी तुटवडा जाणवतो. त्यासाठी ही ओवी र्यावरणाच्या संतुलनाचे महत्व अधोरेखित करते.

**जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहीसकट गोडें ।**
**जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ।।**

निसर्गात ध्यानधारणेसाठी वातावरण कसे असावे याचे वर्णन करताना ज्या ठिकाणी अमृतासारखी मुळे सुद्धा गोड व नेहमी फळांनी युक्त अशी दाट झाडे असावीत. हे वर्णन पाहून निसर्ग किती सुंदर आहे. हे स्पष्ट दिसते. यावरच आधारीत मियावाकी जंगल उभे राहत आहे.

**पाउला पाउला उदकें। वर्षाकाळेंही अति चोखें ।**
**निर्झरें कां विशेखें । सुलभें जेथ ।।**

तेथे पावलापावलावर पाण्याचे झरे असावे ते असे की, ज्याचे पाणी पावसाळ्यातही निर्मळ असते व ते पुष्कळ असून, पाणी सहज घेण्यास व काढण्यास सोपे असावे.

**हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु ।**
**पवनु अति निश्चळु । मंदु झुळके ।।**

सौम्य असे सूर्याचे ऊन ते ऊन स्वच्छ पडले तर त्यापासून ताप उत्पन्न होऊ नये. वारा सुधा मंद व शीतल वाहत असावा. निसर्गाचे महत्व व उपयोग मानवी जीवनात किती महत्वाचे आहेत, हे ऋषीमुनी व संतानी जाणले होते. अनेक महापुरुषानी वनात तपश्चर्या करून जगाला सतकर्माचा मार्ग दाखवला. आज वनांचे अतोनात नुकसान होत असताना त्यांना संरक्षित करावे लागते. याची जाणीव पर्यावरणातील बदलांमुळे झाली. त्यास आज उशीर झाला आहे.

**हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।**
**तरी आतां अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ।।**
**मग हें रसभाव फुलीं फुलेल ।**
**नानार्थ फळभारें फळा येईल ।**
**तुमचेनि धर्मे होईल । सुरवाडु जगा ।।**

या दोन ओवीतून ज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना ज्ञानाचे महत्त्व सांगत त्याची जोपासना करण्याची विनंती करत आहेत. ज्ञानाचे हे सुंदर झाड, जे ज्ञानरूपी फळ देणारे आहे, ते तुम्हीच लावले आहे आणि आता त्याची जोपासना करण्याची जबाबदारी देखील तुमचीच आहे. ज्ञानरुपी झाड फुलांनी फुलून येईल, त्याला नानारुपी अर्थाने भरलेले फळांनी भरेल. शिष्यांनी जगाने श्रवण, मनन, निदिध्यास केल्याने जगासाठी चांगली सुरुवात मिळेल. निसर्ग प्रतिमा आणि मानवी जीवन यातील एकरूपता दर्शवली आहे.

**ऋतुकाळी तरी फळती । परी फळलो हे नेणती ।**
**तया वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मी सदा ।।**

झाडाला विशिष्ठ ऋतूत फळे येतात. त्यांना फळे लागली आहेत. याची जाणीव नसते. मनुष्याने सुद्धावृक्ष सारखे असावे. फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करावे. निष्कामकर्म हा भाव या आधुनिक युगात मानवी जीवनातून निघून चालला आहे. त्यास वृक्षासारखे वागणे जमणार नाही. मानवी स्वार्थ आडवा आल्याने आज वने व वन्यजीव संकटग्रस्त झाले आहेत.

**जयांसि भुकेलिया आमिषा । हें श्व न पुरेचि घांसा ।**
**कुळवाडियांचिया आशा । चाळीत असे ।।**

निसर्गाचा ऱ्हास कसा होतो याचे या ओवीतून दिसून येते. ज्यांना विकासाच्या नावाखाली अनैतिक व्यापार उद्योग विकसित करायचे आहे. जंगल नष्ट करुन व्यापार उभारायचा आहे. अशा नाशकारक, विकारग्रस्त लोक पर्यावरणाला गिळंकृत करायला बसले आहेत. ओवीचा अर्थ त्यांना भूक लागलेली आहे. खाण्यास हे जग एका घासासही पुरत नाही. अशा नाशकारक व्यापारावर जमीन कसणारा नियंत्रण आणीन. असे संत ज्ञानेश्वरांना वाटते. आज आपणही यासाठी निसर्गाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी पुढे आले पाहिजे.

**सुरतरूंची झाडें । आंगणीं लावावीं कोडें ।**
**देयावें कामधेनुचें पाडें । खेळावया ।।**

अंगणात कल्पवृक्षांची झाडे कौतुकाने लावावीत. कामधेनूचे वासरु खेळावयास आणून ध्यावे. या भावार्थातून केवळ जंगलातच झाडे लावली पाहिजे असे नाही तर आपल्या अंगणात भरपूर प्राणवायू देणारी आरोग्यदायक झाडे लावली पाहिजेत. त्यांनाच आपण कल्पवृक्ष म्हणणे योग्य होईल. गाईचे वासरु अंगणात खेळले तर प्राणीमात्राच्या सानिध्याने समृद्धी प्राप्त होईल.

ज्ञानेश्वरीत वृक्षवल्ली बाबत वर्णन आहे तसे पशु पक्षांविषयी अनेक ओव्या आहेत.

**जै आटावे होती जळचर । तै डोही मिळती ढिवर ।**
**का पडावे होय शरीर । तै रोगा उदयो ।।**

या ओवीतून जगातील नैसर्गिकपणे गोष्टी घडतात ते सांगितले आहे. जलाशय आटल्यावर कोळ्यांची ढिवर गर्दी करतात. तसे शरीरक्षय होऊ लागल्यावर अनेक रोग जडतात. पर्यावरणाचा ऱ्हास व मानवी आरोग्य यांचा संबध जोडला आहे.

**पाशिके पोती वागुरा। सुनी ससाणे चिकाटी खोचरा।**
**घेउनी निघती डोंगरा पारधी जैसे ।**

पारधी शिकार करण्यास रानात जातांना ज्याप्रमाणे बरोबर पाश, पोती, जाळी, शिकारी कुत्रे, ससाणे, घोरपडी व भाले वगैरे घेतात. यात ससाणा पक्षी याचा उलेख दिसतो. पुढच्या ओवीतून त्यांनी शिकार करुन पोट भरण्यासाठी प्राणी मारतात, तसे दृष्ट आसुरी लोक द्रव्यप्राप्ती साठी करतात. शिकार करणे हे दुष्टपणा मांडला आहे. आज तस्करी व शिकारीमुळे अनेक प्राणी व पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

**पांख फुटे पांखिरू । नुडे तरी नभींच स्थिरू ।**
**गगन आक्रमी सत्वरू । तो गरुडही तेथ ।।**
**राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शाहाणें ।**
**आणिकें काय कोणें । चालावेचिना ? ।।**

या दोन ओवीतून महाराज सांगतात की प्रत्येकाला स्वतःच्या पद्धतीने जीवन जगण्याचा आणि कार्य करण्याचा अधिकार आहे, क्षमता निर्माण करण्याचे मर्म सांगतात. जे चांगले आहे ते घ्यावे, त्याचा अंगीकार करावा. आपण नेहमी गरुड भरारी घ्यावी असे म्हणत असतो. नुकतेच पंख फुटलेले पाखरु जमिनीवर असले तरी ते आकाशात उंच उडण्याची क्षमता ठेवते. गरुड आकाशात उंच भरारी घेतो, त्याचेही स्थान तिथेच आहे. राजहंसाचे चालणे जरी सुंदर असले तरी, त्याचा अर्थ असा नाही की इतर कोणालाही चालण्याचा किंवा जगण्याचा अधिकार नाही. कोणीतरी चांगले वागत असेल, तर त्याचा अर्थ असा नाही की इतरांनी जगायचेच नाही.

ज्ञानेश्वरीत गरुड, टिटवी, ससाणा, घुबड, चकोर, राजहंस, कावळा, शुक, चातक, मोर, कोकीळ, बगळा, सारस, चक्रवाक, ढिवर, पारवा तसेच साप, विंचू, गाय, बैल, वाघ, सिंह पक्षांचा उल्लेख अनेक ठिकाणी रूपकात्मक तसेच प्रतिकात्मक अर्थाने सांगितले आहे. पक्ष्यांचा उपयोग, त्यांचे कार्य, जीवन सांगताना अनेक ठिकाणी त्यांचा उल्लेख दृष्टांत देण्यासाठी केला आहे.

संत ज्ञानेश्वरांनी जसे वृक्ष, वेली, पशु, पक्षी यांचे महत्व सांगितले तसे पाण्याचे, मातीचे महत्व सांगितले आहे.

**पाणी मुदल झाडा जाये । तृण तें प्रसंगेंचि जिये ।**
**तैसें एका बोलिलें होये । सर्वांहि हित ।।**

झाडाला पाणी दिले तर ते मुख्य झाडाला मिळते. पण त्या बरोबर पाटाच्या काठावरील गवताला मिळते ते सुद्धा वाढते. तसे एखाद्याला ज्ञाना विषयी बोलले तर ते सर्वांना मिळते. ज्ञानेश्वरीत पाणी व्यवस्थापना बरोबर मातीचे संरक्षण व संवर्धन सांगितले आहे.

ज्ञानेश्वरीत तत्वज्ञान, पारमार्थिक, पर्यावरणीय, वैज्ञानिक दृष्टीकोन, साहित्यिक, नैतिक, भूतदया व सामाजिक विषयाने भरलेले असून, पानापानांत निसर्ग जाणवतो, त्यातून सक्षम पर्यावरणाचे बीज पेरले आहे. आज अनेक पर्यावरण व जल योजना ज्ञानेश्वरीच्या ओव्यांवर आधारित दिसतात . ज्ञानेश्वरांनी पसायादानातून विश्वात्मक देवाकडे वाईट दृष्टी नष्ट होऊन सत्कर्म व्हावे यासाठी संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना व प्राणीमात्राच्या हिताची तळमळ व्यक्त करतात.

**जे खळांची व्यंकटी सांडो ।**
**तयां सत्कर्मी रती वाढो ।**
**भूतां परस्परें पंडो । मैत्र जीवाचें।।**

चर्चा आजची

# अस्वस्थ तरुणाई आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

सुयोग आंग्रे

भारतीय लोकशाही आज एका खोल सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरातून जात आहे. हा बदल केवळ संसद किंवा निवडणुकीच्या निकालापुरता मर्यादित नसून समाजाच्या मानसिक जडणघडणीत, संवादाचे स्वरूप आणि जनमत निर्मितीच्या प्रक्रियेपर्यंत पसरला आहे. आज राजकीय प्रवचनाचा मोठा भाग इंटरनेट मीडियावर आकार घेत आहे. इंस्टाग्राम रील्स, यूट्यूब शॉर्ट्स, एक्स-पोस्ट आणि व्हायरल मीम्सच्या माध्यमातून आता पारंपारिक माध्यमांच्या पलीकडे जनमत तयार केले जात आहे. या पार्श्वभूमीवर, ''झुरळ जनता पार्टी'' ची अचानक झालेली लोकप्रियता केवळ डिजिटल ट्रेंड म्हणून नाकारता येणार नाही. सतत उपेक्षित वाटणाऱ्या त्या अस्वस्थ तरुण भारताची ही अभिव्यक्ती आहे. या अभिव्यक्तीतून भारताच्या राजकीय आलेखावर नवा अधोरेखित बिंदू ठळक होण्याच्या दिशेने हि वाटचाल सुरु आहे. जगाच्या पाठीवर तरुणांचादेश म्हणून भारताकडे पहिले जाते. यामुळे तरुणांच्या संख्याबळाचा विचार करता देशात तरुण क्रांती उभी राहिली तर त्या सशक्त आणि सबळ ताकदीसमोर कोणाचाच टिकाव लागणार नाही. समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिले तर, जेव्हा समाजाच्या मुख्य संस्था - राजकारण, प्रशासन, शिक्षण आणि माध्यमे लोकभावनेपासून दूर राहू लागतात, तेव्हा नवीन चिन्हे आणि नवीन राजकीय भाषा जन्म घेतात. बऱ्याच वेळा ही प्रतीके व्यंग्य म्हणून दिसतात, परंतु त्यांच्यात खोल सामाजिक वेदना आणि असंतोष दडलेला असतो. ''झुरळ जनता पार्टी'' हा या डिजिटल युगाचा असाच एक प्रतीकात्मक प्रतिकार आहे. झुरळ हा एक असा प्राणी आहे जो अत्यंत कठीण परिस्थितीतही जगतो.त्यापेक्षा त्याला मारण्याचा प्रयत्न केला तर त्याचे मरण नक्की कशामुळे होईल हे सांगता येत नाही. झुरळाच्या भूमिकेची दाद द्यावी लागेल कारण कोठेहीआणि कसेही संथ गतीने आपले वर्चस्व त्या क्षेत्रात वसवतात. मुळात हा निव्वळ योगायोग म्हणून चालणार नाही. आजच्या तरुणांना एकत्रित करून देशाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेण्याचे ठरवले आहे आणि त्यासाठी झुरळ जनता पार्टीचे नामकरण तरुणांनी केले आहे. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांची अनिश्चितता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक दडपण यांमध्ये कसेतरी पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आजच्या तरुणांना हे प्रतीक आकर्षित करते. भारत आज जगातील सर्वात तरुण लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये आहे. विविध अभ्यासानुसार, देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. दुसरीकडे, सुशिक्षित बेरोजगारी हे एक गंभीर आव्हान आहे. आकडेवारी सातत्याने सूचित करते की तरुणांमधील बेरोजगारीचा दर सरासरीपेक्षा जास्त आहे. लाखो तरुण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करतात, पण भरती प्रक्रिया एकतर उशीरा किंवा वादात अडकली आहे. ही परिस्थिती केवळ आर्थिकच नाही तर सामाजिक असंतोषालाही कारणीभूत आहे. आजच्या तरुणांना फक्त रोजगार नको आहे, त्यांना सन्माननीय सहभाग हवा आहे. लोकशाहीत आपला आवाज ऐकू येतो असे त्याला वाटावेसे वाटते, पण जेव्हा तो मंचांवर केवळ औपचारिक आश्वासने आणि इंटरनेट मीडियावर केवळ प्रसिद्धी पाहतो तेव्हा तो अभिव्यक्तीचे नवीन माध्यम शोधतो. सध्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा कल अधिक स्पष्ट झाला आहे. निवडणुका आता केवळ मतदान केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता मोबाईल स्क्रीनवर लढल्या जात आहेत. राजकीय पक्षांच्या डिजिटल मोहिमा, आयटी सेल आणि इंटरनेट मीडिया स्ट्रॅटेजी जनमत तयार करण्यात निर्णायक भूमिका बजावत आहेत, परंतु या डिजिटल राजकारणादरम्यान एक महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरीत राहतो - आपण तरुण भारताच्या मुख्य चिंता समजून घेण्यास सक्षम आहोत का? आजची तरुणाई पूर्वीसारखी पारंपारिक राजकीय निष्ठेने बांधलेली नाही. तो प्रश्न विचारतो, तुलना करतो, तथ्य तपासतो आणि लगेच उत्तर देतो. इंटरनेट मीडियाने त्यांना अभिव्यक्तीची अभूतपूर्व शक्ती दिली आहे. हे दोन्ही लोकशाहीच्या विस्ताराचे आणि नवीन आव्हानाचे लक्षण आहे. इंटरनेट माध्यमांची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे लोकशाही अधिक सहभागी झाली आहे. लहान शहरे आणि दुर्गम भागातील तरुणही आता राष्ट्रीय प्रवचनाचा भाग बनत आहेत. पूर्वी ऐकू न येणारे आवाज आता थेट लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहेत. भ्रष्टाचार, प्रशासकीय अपयश आणि सामाजिक अन्यायाला तत्काळ प्रतिसाद देणे शक्य झाले आहे. लोकशाहीच्या ताकदीचे हे लक्षण आहे, पण त्याची दुसरी बाजूही गंभीर आहे. इंटरनेट मीडियाने राजकारण अत्यंत तात्कालिक आणि भावनिक बनवले आहे. आता त्यांची व्हायरल क्षमता कल्पनांच्या खोलीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. अनेक वेळा धोरणात्मक वादविवाद मागे राहतात आणि प्रतीकात्मक राजकारण पुढे जाते.

# 'रायगडाचे नवे पॅटर्न'

एकेकाळी 'रायगडाला जेंव्हा
जाग यायची,
तेंव्हा दिल्लीच्या तख्तालाही
धडकी भरायची'
इथल्या मातीचा इतिहास
जाज्वल्य होता,
निष्ठेच्या शब्दालाही
इथे मान होता
रायगड म्हणजे वाघाची
डरकाळी होती,
इमानाची उंच भिंत होती
एकदा शब्द दिला की दिला,
नसायची तिथं
राजकारणाची चिंता,
भले पेटली जरी कोणाची
चिता
पण आता... काळ बदलला,
खेळ बदलला,
तत्त्वांना हरताळ फासला
फक्त विधान परिषदेची
निवडणूक काय जाहीर झाली,
रायगडात गद्दारीची नवी
समीकरणे जुळली...
कालपर्यंत सभा पेटल्या
होत्या,
माईकवर शब्दांचे
बॉम्ब फुटत होते
एकमेकांना रावण, आका,
औरंगजेब,
राजकारणाचे एकमेकांना
खलनायक ठरवत होते
'अब्रुनुकसानीचा दावा ठोकू!'
'त्याला घरात बसवू!'
असं म्हणत म्हणत,
कार्यकर्त्यांच्या छातीत
बारूद भरत होते
कार्यकर्तेही काय कमी
नव्हते...
फेसबुकवर तलवारी,
स्टेटसमध्ये रणधुमाळी
गल्लीत भेटलं की नजरा
वाकड्या होत होत्या,
जणू गावात सुरू असायची
महाभारताची लढाई
कोणी जेलच्या फेऱ्या मारल्या,
कोणी पोलीस स्टेशनचा
रस्ता पाठ केला
कोणी नातं तोडलं,
कोणी मैत्रीवर कायमचा
मातीचा थर चढवला
आणि आता एक काय ती
विधान परिषदेची निवडणूक
काय आली,
सगळ्या भांडणाला
यू टर्न बसले...
कालचे शत्रू आज
मिठीत दिसले,
फोटोमध्ये हसू
जणू नव्याने मनोमिलन झाले
कालपर्यंत 'तो संपला!'
म्हणणारे
'राजकारणात असं चालतं रे'
असं म्हणायला लागले...
कोणाचा मुलगा चर्चेत आला,
कोणाची मुलगी
उमेदवारीत सरकली
कोणाच्या कपाळी
मंत्रिपदाचा टिळा लागला,
कोणाच्या हातात नारळ देऊन
'पुढच्या वेळी नक्की'
म्हणून पेढा भरवला
आणि कार्यकर्ता?
तो अजून चौकात
चहाच्या टपरीवर...
कालच्या पोस्ट डिलीट करत,
आजच्या फोटोला
लाईक मारत बसलाय
एक म्हणाला,
'अरे, रायगडाला जाग आली
की थरकाप उडायचा म्हणे'
दुसरा हसत म्हणाला
'हो रे पण आता
रायगड जागा झाला की,
कोण कुणासोबत जाणार
याचा अंदाज येत नाही'....
शेवटी राजकारणाचा
नवा धडा एवढाच
इतरांना संपवत,
कसेही करून आपण
सत्तेत रहायचं
कालचं वैर स्वार्थासाठी
मैत्रीत बदलायचं,
वेळ पडली की पुन्हा
कार्यकर्त्यांना पेटवायचं
गद्दारीचा शिक्का पडलाय
ना एकदा?
मग त्यावरच नव्याने
शिक्कामोर्तब करायचं
जनतेसमोर तत्त्वज्ञान विकायचं,
आतून मात्र समीकरण जपायचं
कार्यकर्त्यांनी छाती फोडायची,
नेत्यांनी मिठी मारायची
काल ज्यांना शिव्या घातल्या,
आज त्यांच्यासोबत
सेल्फी काढायची
एकेकाळी रायगड
निष्ठेचा गड होता म्हणे,
आता दुर्दैवाने तो
समीकरणांचा बाजार झालाय
फक्त विधान परिषदेची
निवडणूक काय जाहीर झाली,
रायगडात गद्दारीला
नवा बहर आलाय.

– गुरु

दिनविशेष

# जागतिक पर्यावरण दिन

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात (युनो) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी, प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते. २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता. प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. २०२६ च्या जागतिक पर्यावरण दिनाची थीम आहे, हवामान बदल आणि त्यावर त्वरित कृती. या थीमचा मुख्य उद्देश वाढत्या तापमानाला रोखणे, हरित ऊर्जेचा वापर वाढवणे आणि शाश्वत भविष्यासाठी सर्वांना एकत्र आणणे हा आहे. अझरबैजान हा देश या वर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाचा यजमान देश आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

– श्याम ठाणेदार

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ जून

१) श्री. चिंतामण आप्पा म्हात्रे सारळ, अलिबाग, ५-६-१९४१
२) श्रीम. नीलिमा सुधाकर म्हात्रे वेश्वी, अलिबाग, ५-६-१९५२
३) श्री. नंदन पुंडलिक पाटील अलिबाग, ५-६-१९५४
४) श्री. संभाजी ज्ञानदेव कसबे गोंधळपाडा, अलिबाग, ५-६-१९५३
५) श्रीम. सविता चंदकांत भिवंडे थळ, अलिबाग, ५-६-१९५४
६) श्री. सुधाकर नारायण किल्लेकर गोंधळपाडा, अलिबाग, ५-६-१९५८
७) श्री. सदाशिव आत्माराम पाटील कुरूळ, अलिबाग, ५-६-१९५८
८) राजन गणपत म्हात्रे वरसोली, अलिबाग, ५-६-१९५६

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

कै. कालिंदी हेमकांत तुंगारे स्मरणार्थ अलिबाग

### सचिन ठोंबरे यांना पितृशोक



**नागोठणे** : खडक आळी येथील रहिवासी तुकाराम नारायण ठोंबरे (वय ७५) यांचे सोमवारी (दि. १) जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. नागोठणे ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य सचिन ठोंबरे यांचे ते वडील होत. यांच्या पार्थिवावर अंबा घाटावरील वैंकुठ स्मशानभूमीत मंगळवारी दि. २ जून रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी वनिता ठोंबरे, मुलगा सचिन, दोन विवाहित मुली संगीता जासूद व कल्पना नितीन राऊत, सून, जावई, नातवंडे यांच्यासह मोठ्या परिवार आहे. यांचे दशक्रिया विधी बुधवार दिनांक १० जून रोजी उद्धर तर उत्तरकार्य शुक्रवार दिनांक १२ जून रोजी खडकआळी - नागोठणे येथे घरी होणार असल्याचे ठोंबरे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

### सुवर्णा म्हात्रे यांचे निधन



**वाघ्रण** : आलिबाग तालुक्यातील नारंगी गावच्या ज्येष्ठ महिला सुवर्णा जयवंत म्हात्रे यांचे रविवारी (दि. ३१) मे रोजी वृद्धपकालीननिधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांचे दिवसकार्ये शुक्रवार दिनांक १२ जून रोजी ९ वाजता भुवनेश्वर येथे होणार आहेत. त्यांच्या मागे दोन मुलगे एक मुलगी स्नुशा व नातवंडे असा परिवार आहे.

# खालापूर पं.स.चा दिल्लीत सन्मान

## • गावाचा जल समृद्ध गाव म्हणून उल्लेख • पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर पंचायत समितीच्या मुकुटात आणखी एका पुरस्काराची नोंद झाली आहे. संपूर्ण देशात जल समुद्ध गाव म्हणून खालापूर तालुक्यातील ग्राम पंचायत खरीवली यांना देशात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने दिल्ली येथे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार कार्यक्रमात केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह, पंचायत राज राज्य मंत्री एस पी सिंह वघेल यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सरपंच सुंदर पवार, ग्राम पंचायत अधिकारी मनाली महेश म्हसे, उप सरपंच सुशांत विचारे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. शासनाच्या नाविन्य पूर्ण अभियानाचे रूपांतर गावच्या सर्वांगीण विकासात करण्यासाठी खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड हे रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असून विस्तार अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, सरपंच, सदस्य अहोरात्र मेहनत घेताना दिसत आहेत. खालापूर पंचायत समिती शासनाच्या नाविन्य पूर्ण अभियानात राज्यात प्रथम स्थानावर असून आता दिल्ली कडे गरुड झेप घेऊन जल समृद्ध गाव म्हणून खरीवली यांनी दिल्लीत पुरस्कार प्राप्त केला.

जलसमृद्ध या योजनेतून ग्राम पंचायत खरिवली यांनी काम करून देशात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. सात नवीन जल स्तोत्र, चौदा पाणी स्तोत्राचे पुनर्जीवन केले. राज्य सरकारने राज्य सरोवर निधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थांनी जल समृद्ध करण्यासाठी प्रयत्न केले. जल जीवन मिशन, पंधरावा वित्त आयोग यातून पाणी स्रोत निर्माण करण्यावर भर दिला. जिल्हा नियोजन यातूनही कामांना सुरुवात केली. विशेष म्हणजे सर्व पाणी पुरवठा योजना सोलर पॅनल वर करण्यात आली आहे. शाळा, अंगणवाडी, ग्राम पंचायत सर्व ठिकाणी सोलर पॅनल सुरू करण्यात आले आहे.

जल समृद्ध गाव म्हणून काम करण्याची संधी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तनपुरे,गट विकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी यांचे मार्गदर्शन, योग्य सहकार्य मिळाल्याने हे यश प्राप्त झाले, असे ग्राम पंचायत अधिकारी मनाली महेश म्हसे यांनी सांगितले आहे.

**पाणी टंचाईवर मात**

पाणी टंचाईवर मात करून शाश्वत पाणी व्यवस्थापन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. खरिवली ग्राम पंचायत यांनी जलसंधारण, विहिरींचे पुनर्भरण, शेततळे, नळजोडणी आणि पाण्याचा योग्य वापर यांद्वारे शेती व पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध केले आहे, ज्यामुळे गावाचा जल समृद्ध गाव म्हणून उल्लेख झाला.



## कोलाड परिसरात मान्सूनपूर्व पाऊस

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

कोलाड परिसरात मंगळवारी (दि.२) जुन रोजी पावसाची सुरुवात झाली. गेली अनेक दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना थोडा फार दिलासा मिळाला. दरम्यान मान्सूनच्या आगमनाचा मुहूर्त पुन्हा एकदा चुकवला असून काही दिवस तरी नागरिकांना पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. कारण येत्या एक ते दोन दिवसात नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून व्यक्त करण्यात आला आहे. कोकणात ७ जुन नंतर पाऊस पडणार असल्याची शक्यता आहे. यामुळे अजून चार ते पाच दिवस पावसाची वाट पाहावी लागणार आहे. परंतु काल झालेल्या जोरदार पावसाने उकाड्याने हैराण झालेल्या कोलाड परिसरातील नागरिकांना थोडाफार दिलासा मिळाला आहे.

## विजेची समस्या न सुटल्यास आंदोलनाचा इशारा



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील पाव भाट बोरी येथील रहिवाशी १५ वर्षांपासून विजेच्या समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यांच्याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. बोरी पाव भाट येथे सिंगल फेज विद्युत नागरिकांना मिळत आहे. गेले पंधरा वर्षापासून हे नागरिक एमएसईबी उरण येथे ट्रिपल फेस विद्युत पुरवठा मिळावा म्हणून मागणी करत आहेत. नागरिकांकडे सिंगल फेज असल्यामुळे फ्रीज टीव्ही व इतर उपकरणे व्यवस्थित चालत नाही. विद्युत पुरवठा कमी असल्यामुळे अनेक वेळा अनेक उपकरणे बिघडून जात आहेत. याबाबत अनेक वेळा त्यांनी तक्रार केली. पाठपुरावा करून देखील थ्री फेज लाईन आली नाही. स्थानिक एक कुटुंबाचा विरोध असल्यामुळे एमएसईबी चे कर्मचारी पोल टाकायला येतात आणि हे कुटुंब त्याला विरोध करतो. एमएसईबीचे लोक निघून जातात. याचा त्रास इतर नागरिकांना होत आहे. यावर त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी जनतेतून केली आहे. या मागणीसाठी काँग्रेस पक्षाने सुद्धा पाठपुरावा सुरु केला आहे. मागणी मान्य न झाल्यास ५ जून रोजी काँग्रेसतर्फे कोटनाका एमएसईबी वीज महावितरणच्या कार्यालयावर निदर्शने करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# महागाईविरोधात राष्ट्रवादीचे वाशीत आंदोलन



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि सर्वसामान्य नागरिकांवर वाढत चाललेला आर्थिक भार याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने बुधवारी (दि.३) जून रोजी वाशी येथे जोरदार आंदोलन करत केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीकास्त्र सोडले. जीवनावश्यक वस्तू, घरगुती गॅस आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले असून सरकारने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मागण्यांची दखल न घेतल्यास महाविकास आघाडीतर्फे मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरसमोर झालेल्या या आंदोलनात आ. रोहित पवार यांच्यासह नवी मुंबई, पनवेल, ठाणे, मुंबई आणि परिसरातील शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबे, नोकरदार वर्ग, लघुउद्योजक आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याचा आरोप करत सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

आंदोलनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, खा. सुप्रिया सुळे यांनी सरकारवर विविध मुद्द्यांवरून टीका केली.

## अंबाजी सालसकर यांना देवज्ञा

**खांब** : रोहा तालुक्यातील बाहे गावातील अंबाजी विठ्ठल सालसकर यांचे (दि.२८) मे रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी शनिवार दि.६ जून रोजी तर अंतिम धार्मिकविधी मंगळवारदि.९ जून रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## ‘धाकटा खांदा गावातील चौकाला विश्वास म्हात्रे यांचे नाव द्या’

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

पालिकेच्या नव्याने बांधण्यात येत असलेल्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीसमोरील, धाकटा खांदा गावाच्या प्रवेशद्वारापाशी) असलेल्या चौकाला शिवसेना माजी नगरसेवक विश्वास म्हात्रे यांचे नाव देण्यात यावे, अशी आग्रही मागणी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १४ च्या नगरसेविका आर्या जाधव यांनी केली आहे. या संदर्भातील मागणीचे पत्र त्यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त आणि नगर सचिवांना सादर केले आहे.

धाकटा खांदा गावचे रहिवासी असलेले विश्वास म्हात्रे यांचा धाकटा खांदा गावाच्या विकासामध्ये अतिशय मोलाचा हातभार लागला आहे. त्यांनी जनहिताची अनेक कामे करून परिसरात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती.

त्यांचे हे मोलाचे योगदान आणि त्यांची आठवण कायमच नागरिकांच्या स्मरणात राहावी, या उद्देशाने पालिकेच्या मुख्य कार्यालयापुढील धाकटा खांदा गावाच्या प्रवेव्दार असलेल्या चौकाचे विश्वास म्हात्रे माजी नगरसेवक चौक असे नामकरण करण्यात यावे, अशी विनंती नगरसेविका आर्या जाधव यांनी या पत्राद्वारे प्रशासनाकडे केली आहे.

# सर्पदंशावरील संशोधनासाठी नवी दिशा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सर्पदंशावरील प्रभावी उपचारपद्धती विकसित करण्यासह जागतिक आरोग्य संशोधनाला चालना देण्यासाठी मुंबईतील हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था आणि घाना सरकारच्या सेंटर फॉर प्लांट मेडिसिन रिसर्च यांच्यात धोरणात्मक सहकार्याची दिशा निश्चित करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. परळ येथील हाफकिन संस्थेच्या मुख्यालयात झालेल्या या बैठकीत दोन्ही संस्थांनी वैज्ञानिक संशोधन, पारंपरिक औषधांचे वैज्ञानिक प्रमाणीकरण आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सहकार्याच्या विविध संधींचा आढावा घेण्यात आला.

हाफकिन संस्थेचे संचालक डॉ. सुवर्णा खरात तसेच संस्थेतील अजित जगताप, मृणाल घाग सावंत यांच्या समवेत झालेल्या बैठकीत घानाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने सहभाग घेतला. या शिष्टमंडळात सीपीएमआरचे अध्यक्ष हेन्री रॉकफेलर निम्बाबोउरा, प्रा. ॲलेक्स असासे, उपकार्यकारी संचालक डॉ. जोनास कोफी डॉनकोर, फॉर्माकॉलॉजी व टॉक्सिकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. स्टीफन अँटवी तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हॅक्सिनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. फैसल नहू आणि तांत्रिक सल्लागार डेव्हिड बोआमा अचेम्पाँग यांचा समावेश होता.

बैठकीत विशेषतः सर्पदंशामुळे होणाऱ्या विषबाधेच्या वाढत्या समस्येवर सखोल चर्चा करण्यात आली. आशिया आणि आफ्रिकेतील ग्रामीण व वंचित भागांमध्ये सर्पदंश हा गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न बनला असून त्यावरील स्वस्त, प्रभावी आणि सहज उपलब्ध उपचारांची गरज अधोरेखित करण्यात आली. दोन्ही संस्थांनी वनस्पतीजन्य औषधांच्या आधारे सर्पदंश व्यवस्थापनासाठी नवीन उपचारपद्धती विकसित करणे, झेब्राफिश आधारित प्रीक्लिनिकल मॉडेल्स तयार करणे, संयुक्त संशोधन प्रकल्प राबविणे, आंतरराष्ट्रीय संशोधन अनुदानांसाठी प्रस्ताव सादर करणे आणि वैज्ञानिक क्षमतावृद्धीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

## निवडक



### विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वाटप

**पाली :** आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र पुणेचे अध्यक्ष अंकुश आपटे यांचा वाढदिवस १ जून रोजी विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास दादा घोसाळकर, निलेश थोरे, रोहन दगडे, सुशील शिंदे, प्रणाली शेठ, सुजित बारस्कर, बल्लाळेश्वर देवस्थानाचे सरपंच जितेंद्र गद्रे, संदेश पवार, मनोहर शिंदे, अस्मिता ब्रीद बारस्कर, धनंजय गद्रे, चिवे ग्रामपंचायत सदस्य ठाकूर, आणि शेकडो विद्यार्थी त्यांच्या पालकांच्या समवेत उपस्थित होते.

### ‘जनगणना कर्मचाऱ्यांना मदत द्या’



**खरोशी :** राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार नोंदणी आणि जनगणना कामकाजात कार्यरत असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शासकीय कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या कर्मचाऱ्यांना तातडीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची तसेच कर्तव्य बजावताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी शिक्षक आ. ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राष्ट्रीय कर्तव्य बजावताना मृत्यू झालेल्या शिक्षक, शिक्षकेतर व इतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत, तसेच ड्युटीदरम्यान आजारी पडून रुग्णालयात दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने उचलावा अशी मागणीही त्यांनी केली आहे. या मागणीमुळे जनगणना व निवडणूकसंबंधित कामकाजात गुंतलेल्या हजारो कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून याबाबत सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मुंबईत पावसाच्या सरी

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या तीव्र झळा सहन करणाऱ्या मुंबईकरांना बुधवारी (दि.३) जून रोजी सकाळी पावसाने दिलासा दिला. पहाटेपासूनच मुंबईच्या पश्चिम उपनगरांमध्ये हलका ते मध्यम पाऊस झाला. विशेषतः मीरा-भाईंदर परिसरात मान्सून हंगाम २०२६ मधील पहिल्या पावसाची नोंद झाली. या पावसामुळे वातावरणात काही प्रमाणात गारवा निर्माण झाला असला तरी सकाळच्या पावसानंतर हवेत आर्द्रतेचे प्रमाण वाढण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तविली आहे. हवामान रडारवरील निरीक्षणांनुसार उत्तर मुंबईच्या किनारपट्टीलगत अरबी समुद्रात मध्यम तीव्रतेचे ढग सक्रिय झाले होते. त्यामुळे उपनगरांमध्ये अधूनमधून हलक्या सरींची शक्यता कायम होती. दरम्यान, सकाळी काही भागांत सूर्यदर्शनही झाले असून ढग आणि ऊन असा खेळ सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले. उपग्रह चित्रांमधून कोकणाच्या दक्षिण भागात, गोवा, कर्नाटक किनारपट्टी तसेच केरळच्या उत्तरेकडील भागात विखुरलेल्या ढगांची मोठी पट्टी सक्रिय असल्याचे दिसून आले आहे. या प्रणालींचा परिणाम पुढील काही तासांत किनारपट्टी भागांवर जाणवू शकतो, असे हवामान तज्ज्ञांचे मत आहे. दरम्यान, हवामान खात्याने नागरिकांना हलके व आरामदायी कपडे परिधान करण्याचा, पुरेसे पाणी पिण्याचा आणि हवामानातील बदलांवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला आहे. उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला असला तरी वाढलेल्या आर्द्रतेमुळे उकाड्याची जाणीव कायम राहू शकते. मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा करणाऱ्या मुंबईकरांसाठी ही पावसाची हजेरी दिलासादायक ठरली असून येत्या काही दिवसांत पावसाच्या सरींची वारंवारता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### रेवा संस्थेची कार्यकारणी जाहीर



**रोहा** : रोहे शहरातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रोहा एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशन संस्थेच्या अध्यक्षपदी तोसीफ जाफर येरुणकर यांची निवड करण्यात आली. रेवा संस्थेच्या निवडणुक मंगळवारी निवडणूक निर्णय अधिकारी जाफर भाई येरुणकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत नूतन कार्यकारणी पदाधिकारी निवड करण्यात आली. यात संस्थेच्या अध्यक्षपदी तोसीफ येरूणकर, उपाध्यक्षपदी अतिक बडे व सरफराज बंदरकर सचिवपदी अ.करीम खतीब, सह सचिवपदी हाफिज फैसल पेडेकर, खजिनदारपदी अनिस मोर्बेकर यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे रेवा इंग्लिश मिडीयम स्कूलच्या चेअरमनपदी दिलावर हाफिज व व्हा.चेअरमनपदी मुनाफ कागदी व अंजुमन इस्लाम उर्दू हायस्कूल संस्थेच्या चेअरमनपदी अ. कादिर रोगे, व्हा. चेअरमनपदी आरिफ अधिकारी यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या कार्यकारी मंडळावर उस्मान रोहेकर, जावेद खेडेकर, फरहान पेडेकर, डॉ. सीमाब पल्लवकर, सय्यद मोर्बेकर, परवेज चोगले व अजिज महाडकर यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची रियाज शेटे, जुबेर चोगले, फारुख बडे, डॉ. फरिद चिमावकर आदींनी अभिनंदन केले.

### मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण प्रवेश सुरू

**मुंबई :** राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा विकास आणि विस्तार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत ‘सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन’ या सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या १३६ व्या सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, वर्सोवा, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार असून इच्छुक मच्छिमार युवकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये नौकानयनाची मूलतत्त्वे, सागरी डिझेल इंजिनच्या विविध भागांची माहिती, देखभाल व दुरुस्ती, तसेच आधुनिक मासेमारी साधनांचा वापर यांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. १ जुलै २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत चालणार आहे. प्रशिक्षणासाठी दारिद्र्यरेषेखालील प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रतिमहिना १०० रुपये, तर इतर प्रशिक्षणार्थ्यांकडून ४५० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी विजय कोळगे, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी (मो. ८७७९८३९७४३) तसेच जयहिंद सुर्यवंशी, यांत्रिकी निर्देशक (मो. ७५०७९८८५५२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे किनारपट्टी भागातील युवकांना तांत्रिक कौशल्य प्राप्त होऊन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सुरक्षित नौकानयन आणि इंजिन देखभालीचे प्रशिक्षण मिळाल्याने मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होण्यास मदत होणार आहे.

**शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अनोखा उपक्रम** | **आगामी काळात ज्योतिर्लिंग पूर्ण करण्याचा संकल्प**

# छत्रपतींचा पुतळा पायी प्रवास



**। पाली । प्रतिनिधी ।**

शिवाजी महाराजांबद्दल अथांग आदर व सार्थ अभिमान बाळगणारा एक तरुण सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दर्शनाची तीव्र ओढ असलेला शिव एकनाथ शिंदे (वय-३०, रा. आडगाव भोसले, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर) हा तरुण पाठीवर धान्य, कपडे, भांडी आणि डोक्यावर लोखंडी चौकटीवर विराजमान असलेला शिवरायांचा पुतळा घेऊन रणरणत्या उन्हात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त संभाजीनगर ते त्र्यंबकेश्वर आणि तिथून पुढे किल्ले रायगड असा पायी प्रवास करत आहे. एकूण ३९ किलो वजनाचा हा संपूर्ण लावाजमा सांभाळत त्याचा हा खडतर पायी प्रवास सुरू आहे.

हा शिवप्रेमी मंगळवारी (दि. २) श्री बल्लाळेश्वर क्षेत्र पाली येथे दर्शनासाठी पोहोचला. तेथे किल्ले सरसगडाला मानवंदना देऊन त्याने पुढे रायगड किल्ल्याकडे कूच केली. या प्रवासादरम्यान जागोजागी अनेक शिवप्रेमींनी त्याचे मनापासून स्वागत केले आणि त्याच्यासोबत असलेल्या महाराजांच्या पुतळ्याचे भावुक होऊन दर्शन घेतले. बुधवारी (दि. ३) तो किल्ले रायगडावर पोहोचला. शनिवारी (दि. ६) शिवराज्याभिषेक झाल्यावर तो परतीच्या मार्गाला लागणार आहे. या आधी त्यांनी पायी चार हजार किलोमीटरचा प्रवास केला आहे. वर्षभरातील ११ महिने घरी राहिल्यानंतर पुन्हा एक महिना त्याचा हा अनोखा प्रवास अशाच पद्धतीने सुरू होतो. आगामी काळात पायी चालत एक जोतिर्लिंग पूर्ण करून पुन्हा रायगडकडे येण्याचा त्याचा संकल्प आहे. अशा प्रकारे त्याला बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन पूर्ण करायचे आहे. व प्रत्येकवेळी रायगडकडे यायचे आहे. या खडतर प्रवासाबाबत जेव्हा काही शिवप्रेमींनी त्याला विचारले की, तुम्ही एवढ्या लांबचा पायी प्रवास कसा काय करता? तेव्हा त्याने अतिशय स्वाभिमानाने उत्तर दिले, मला अभिमान आहे की माझा जन्म छत्रपती शिवाजी महाराजांच्या भारतात आणि महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत झाला आहे. घरातून प्रवासासाठी बाहेर पडल्यानंतर मला खऱ्या अर्थाने कळाले की, या भारताच्या भूमीत महाराजांचे स्थान किती अढळ आहे. महाराजांनी आपल्यासाठी केवढे मोठे वैभव आणि ओळख निर्माण करून ठेवली आहे, याची प्रचिती मला पावलोपाव आली. रस्त्याने जाताना प्रत्येक निष्ठावंत शिवप्रेमी मला थांबवून महाराजांचे दर्शन घेत होता. अनेक जण हात मिळवून माझे अभिनंदन करत होते. पाली-सिद्धेश्वर मार्गावरून प्रवास करत असताना या शिवप्रेमीचे अनोखे कौतुक करण्यात आले.

# कोळी बांधवांच्या प्रश्नांसाठी लढणार!



## ● आमदार रोहित पवार यांचे आश्वासन

| उरण | प्रतिनिधी |

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उरण तालुक्यातील करंजा येथे भेट देत कोळी बांधवांशी सुसंवाद साधला. यावेळी मच्छिमारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या जाणून घेत त्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

आ. रोहित पवार यांचे जागृत द्रोणागिरी मातेच्या मंदिरासमोर उत्साहात स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी करंजा मच्छिमार सहकारी सोसायटीच्या कार्यालयात पदाधिकारी व कोळी समाजातील प्रतिनिधींसोबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मासेमारी व्यवसायासमोरील अडचणी, समुद्रातील वाढते निर्बंध, विविध प्रकल्पांमुळे होत असलेले नुकसान तसेच मच्छिमारांच्या उपजीविकेवर होणारे परिणाम याविषयी सखोल चर्चा करण्यात आली.

मार्तंड नाखवा यांनी निवेदन सादर करीत मच्छिमार समाजाची होत असलेली पिळवणूक आणि विविध प्रलंबित प्रश्न आ. पवार यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर आ. रोहित पवार यांनी सर्व बाबी समजून घेत संबंधित विभाग आणि शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रश्न सोडविण्यासाठी वेळ लागेल, मात्र योग्य त्या ठिकाणी पाठपुरावा करण्यास आपण कटिबद्ध आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

उरण दौऱ्याबाबत बोलताना अनेक महिन्यांपासून उरणला भेट देण्याची इच्छा असल्याचे आ. पवार यांनी सांगितले. विविध कारणांमुळे हा दौरा पुढे ढकलला जात होता. अखेर उरण नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या प्रयत्नांमुळे हा दौरा यशस्वीरीत्या पार पडला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १. श्री. दीपक विश्वनाथ हरलालका २.श्री गौतम विनोदकुमार हरलालका ३. श्री.मनीष विनोदकुमार हरलालका यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२५ | ३ | ०-७६-०० | ६.५५ |
| १२६ | ६ | ०-४५-०० | ०.४२ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.०५/०६/२०२६.

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे,**
पत्ता-ओमकार अपा.मु.डिकसळ,
पो.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड.
मो. ९६०७५५६३१५.

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्या मिळकतींचे विद्यमान मालक १. सौ.इंदु नरेश जैन, २ सौ. अल्पा किशोर जैन सर्व रा.मु.मेन बाजारपेठ रोड, पोयनाड, ता.अलिबाग जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचा शोध घेणकरिता व त्या मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**गाव मौजे-आंबेपुर ता.अलिबाग, जि.रायगड**

| स.नं./ग.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार रू. पै |
|---|---|---|
| ५८/१/२४ | २.७३.०० | २७.३० |

तरी, सदर मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, पतसंस्थेच्या कर्जाचा बोजा आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी येणे प्रमाणे विहित मुदतीत कोणाची ही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ०४/०६/२०२६

**ॲड. रसिका अमर जोशी.**
रा.मु.नवखार, पो.सुडकोली
ता.अलिबाग, जि.रायगड
७०२०२७११२६

### जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे किहिम, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाच्या मिळकती विकण्याचे ठरविले आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याबाबत टायटल सर्च घेणेंच्या सूचना मला देण्यात आल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| किहिम, ता.अलिबाग, जि.रायगड | गट क्र. १०६ (जुना गट क्र.५०४) | ०-०८-६० | २.०६ |
| किहिम, ता.अलिबाग, जि.रायगड | गट क्र.१०८ (जुना गट क्र.५०६) | ०-११-६० | २.२५ |
| | एकूण | ०-२०-२० | |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांची हरकत, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग :
दि. ०४.०६.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबाग समोर,
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. सुशिल धरमचंद कटारीया एच.एफ.यु यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ ) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १३३ | १४ | १-७५-०० यापैकी विकत देत असलेले क्षेत्र ०-७९-० हे.आर.पॉ पर्यंत | ०-७५ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०६/२०२६

**ॲड संजय हरिश्चंद्र म्हसे**
ऑफीस-रा.बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरल-पश्चिम ता.कर्जत, जि.रायगड.
मो. ९२६०२०९०९६

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, हे श्रीमती. धर्मिष्ठा विजय डोदिया यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटादरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - शिंगढोळ ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १८/११/क | ०.१२.०० पो.ख ०.०८.०० एकूण क्षेत्र ०.२०.०० | ०.१० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ०७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
कर्जत दि.०५/०६/२०२६

**ॲड. वैभव अ. शिंदे**
**ऑफिस :-** फ्लॅट नं १०. दुसरा मजला
श्री साई सावली कॉ ऑप.हौ.सो, कर्जत कोर्ट समोर,
कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो. ७०५८८५१२२१/७७४४८५१४६९

### जाहीर नोटीस

मी, हरकतदार श्रीमती. सुजाता प्रभाकर काठे रा.मु.पो.मापगांव ता.अलिबाग, जि.रायगड या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळवू इच्छिते की, दि.१४/०५/२०२६ रोजी दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये खालील मिळकतींसंदर्भात मिळकतींचे सभांव्य खरेदीदारांमार्फत ॲड. एस.वाय.बारटके यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली होती.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | मालकांचे नांव |
|---|---|---|---|---|
| मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड | २५५/१ | ०-२२-८० | ४.९२ | दर्शना प्रितम नाईक<br>कल्पेश कमळाकर राऊत<br>कल्पना कमळाकर राऊत |
| मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड | २५५/२ | ०-२२-८० | ४.९२ | मंगेश सिताराम राऊत<br>सुरेखा प्रविण घरत |

दि.१४/०५/२०२६ रोजीच्या जाहीर जाहीर नोटीसीच्या अनुषंगाने मी. दि.२७/०५/२०२६ रोजी सदरहू मिळकतींच्या हस्तांतरणासंदर्भात दैनिक कृषीवल व दैनिक रत्नागिरी रायगड टाईम्स या वृत्तपत्रांमध्ये ॲड.सुनिल के.वाकडे यांच्या मार्फत जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन हरकत घेतलेली आहे.

मी, दैनिक कृषीवल व दैनिक रत्नागिरी रायगड टाईम्स या वृत्तपत्रांमध्ये दि.२७/०५/२०२६ रोजी मिळकतींच्या हस्तांतरणासंबंधी घेतलेल्या हरकती स्वतःहून मागे घेत आहे.

सही/-
**श्रीमती. सुजाता प्रभाकर काठे**
रा.मु.पो.मापगांव, ता. अलिबाग,
जि.रायगड.
मो.नं.८३२९७३३२३४

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक:-०४/०६/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री,व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

स्वस्तिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., अलिबाग, सीटी सर्व्हे नं.४३४/अ/१/२/१. ता. अलिबाग, जि. रायगड यांनी जमीनमालक व विकासक, कांतीलाल खिमजी जैन तर्फे वारस, १. श्रीमती वर्षा कांतीलाल जैन, २. खुशबु कांतीलाल जैन, रा.जैनवाडी, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता.अलिबाग, अलिबाग येथील नगर
भूमापन क्रमांक - ४३४/A१/२/१, क्षेत्र ५८७.६५ चौ.मी.,

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०६/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- ०४/०६/२०२६

सही/-
**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे-चौल ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान १) संतोष अनंत गोंधळी, २) सचिन अनंत गोंधळी, ३) प्रांजल उर्फ प्रांजली प्रवीण राऊत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग. जि. रायगड | ६७२/२ | ०.०५.५० पो.ख. ०.००.०० एकूण ०.०५.५० | १.८६ |

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०४/०६/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे फुफादेवीपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड येथीन खालील वर्णनाच्या मिळकतीपैकी श्रीमती. शशिकला रामनाथ ठाकूर यांचा अविभक्त हिस्सा आमचे अशिलांनी कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| फुफादेवीपाडा | १३/१/१ | ०-३०-६० पो.ख.०-०२-०० ०-३२-६० | ८.१२ |

पैकी श्रीमती. शशिकला रामनाथ ठाकूर, यांच्या १/५ अविभक्त हिश्याचे उत्तर-पश्चिमेकडील क्षेत्र, ही मिळकत (सदर मिळकत).

सदर मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध असुन त्यांतील अविभक्त हिस्सा विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आम च्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मि ळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : ५/६/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

वरील मजकुराची जाहीर नोटीस कोणत्याही व कितीही वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यास आमची हरकत नाही.

सह्या
१) श्रीमती.शशिकला रामनाथ ठाकूर,
२) श्री. गोपीनाथ शांताराम पाटील,
३) श्री. विश्वनाथ शांताराम पाटील,

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या जमिन मिळकती कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तशा सदरच्या व्यवहाराची बोलनी विद्यमान मालक सौ. रेणु कृष्णा महतो यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे कायम खरेदी करण्यास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| पेढांबे ता.अलिबाग | ५० | जिरायत ०-७४-१० पो.ख. ०-०५-०० एकुण क्षेत्र ०-७९-१० | १४.८३ |

वर वर्णन केलेल्या पूर्ण जमिन मिळकती पैकी सौ. रेणु कृष्णा महतो यांच्या नावे असलेली क्षेत्र. ०-४०-०० आकार- ८.०१ एवढी मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. नभेश भास्कर ठाकुर**
रा.-महाजने, पो. मल्याण,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. न. ७०६६७०९५९७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग २६६, एकुण क्षेत्र : ००-८४-३० (हे.आर.) (ला.यो.क्षेत्र ००-८१-०० + पो.ख. ००-०३-३०), आकार १९.७५ (रू.पैसे) या शेतजमीन मिळकती पैकी ००-२०-०० हे.आर. क्षेत्राची मिळकत ही सौ.हर्षदा हेमनाथ घरत यांच्या मालकी व ताबेकब्जाची असून आमच्या अशिलांनी वर नमुद मिळकत कायम विकत घेण्याबाबत त्यांचे सोबत व्यवहार ठरविलेला आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याबाबत वरील विद्यमान मालकाने हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, हक्कसोडपत्र, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लायन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, अथवा सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित असल्यास, अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासंहीत हरकत सादर करावी.

उक्त मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्विवाद आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. उक्त मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०५/०६/२०२६

**(ॲड. अजहर एम.घट्टे)**
घट्टे वाडी, मुख्य पोस्ट ऑफिस जवळ,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.
४०२२०१, मो. ९७६३४१८३१४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेल्या शेती मिळकतीमधील विद्यमान मालक वसंत विठ्ठल गावंड यांच्या मालकीचे क्षेत्र खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २९७ | ०-६३-८० | १६-५१ |

सदर मिळकतीमधील विद्यमान मालक वसंत विठ्ठल गावंड यांचे मालकी व ताबा वहिवाटीतील ०-२३-६० हे.आर.चौ.मी. क्षेत्र, आकार रू.६-२२ पै.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०५/०६/२०२६

**ॲड.रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा '' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक रत्नाकर पदाजी पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू पै.) |
|---|---|---|---|
| २८ | ९ | ०-८०-०० | ०-६९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०५/०६/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती, परिशिष्टा नमूद केलेल्या जमिन मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदरील जमिन मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खाली परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील जमिन मालकांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) | जमिन मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| बेलोशी ता.अलिबाग. | ४०६/१ | ०-५३-२० ०-१६-४० पो.ख. ०-६९-६० एकूण | १-०१ | श्री.नंदकिशोर मुकुंद शिंत्रे |
| बेलोशी ता.अलिबाग. | ४०६/२ | ५-८६-०० एकूण | ८-६२ | श्री.नंदकिशोर मुकुंद शिंत्रे<br>श्री.जयेंद्र मुकुंद शिंत्रे<br>श्रीमती संगीता नरेश शिंत्रे<br>श्री.सचिन नरेश शिंत्रे |
| बेलोशी ता.अलिबाग. | ४०६/३ | १-२६-०० ०-३४-०० पो.ख. १-६०-०० एकूण | २-०० | श्री.जयेंद्र मुकुंद शिंत्रे |

अलिबाग,
दिनांक : ०१/०६/२०२६.

सही/
**(ॲड.सतिश शंकर पाटील)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या शेती मिळकती त्यांचे विद्यमान मालकांकडुन खरेदी घेण्याचा करार केला आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकांचे नाव | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| संतोष चिंतामण पाटील | ३०७ | ००-२०-५० | ४.८७ |
| संतोष चिंतामण पाटील<br>सुजाता संतोष पाटील | ३०८ | ००-२५-०० | ००.५२ |
| संतोष चिंतामण पाटील | ३१० | ००-३८-०० | ०.७९ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क चितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०५/०६/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा '' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक



### खोपटे-कोप्रोली मार्गावर गतिरोधकाची मागणी

**चिरनेर** : उरण तालुक्यातील खोपटे-कोप्रोली या नव्याने काँक्रीटीकरण करण्यात आलेल्या मुख्य महामार्गावर वाहनांचा वाढता वेग नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थ मंडळ खोपटे यांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसील प्रशासनाकडे (दि.२) जून रोजी लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. उरण-खोपटा हा परिसरातील अत्यंत महत्वपूर्ण व वर्दळीचा मार्ग मानला जातो. रस्त्यालगत अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने अवजड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. नुकतेच या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यापासून वाहनचालकांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे याच मार्गावरून दररोज शेकडो शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्ण प्रवास करत असतात. रस्त्यावर गतिरोधक नसल्याने यापूर्वी अपघात घडले असून, भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### शैक्षणिक साहित्याची भाव वाढ

**कोलाड** : नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असतानाच खाजगी शाळांकडून गणवेश, वह्या, पुस्तके तसेच इतर शैक्षणिक साहित्यांच्या वाढलेल्या दरांमुळे पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक शाळांकडून विशिष्ट दुकानांतूनच साहित्य खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याची तक्रार पालकांकडून करण्यात येत आहे. गणवेशांच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याने एका विद्यार्थ्यामागे हजारो रुपयांचा अतिरिक्त खर्च पालकांना सहन करावा लागत आहे. याशिवाय वह्या, पाठ्यपुस्तके, शूज, बॅग, आयकार्ड, ड्रॉइंग साहित्य अशा विविध वस्तूंचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.



### ताडपत्री खरेदीसाठी दुकानात गर्दी

**रोहा** : मंगळवारी अचानक आलेल्या पावसामुळे ताडपत्री व मेणकापड खरेदी करण्यासाठी दुकानात गर्दी वाढू लागली असल्याचे पहावयास मिळत आहे. घराचे छप्पर, गॅलरी, टेरेसचा भाग आदी घरांचे आवरण झाकण्याबरोबरच शेतकरी वर्गाला गुरांचे गोठे शिवण्यासाठी तसेच गुरांच्या साठवणूकीच्या पेंढ्यांच्या गंज्या आछादण्यासाठी ताडपत्री व मेणकापडांची नितांत गरज असते.यामुळे ही कामे पाऊस सुरू होण्यापूर्वीच पुर्ण करणे गरजेचे असल्याने शेतकरीवर्गासह अन् घटकांतील रहिवासी वर्गही ताडपत्री व मेणकापड खरेदी करण्यासाठी ताडपत्रींच्या दुकानात गर्दी करू लागले आहेत.बाजारात मिळणाऱ्या ताडपत्रींच्या प्रकारात युव्हि-स्टॅबिलाइज्ड पिव्हिसी ताडपत्री ही अतिनील किरणांपासून बचाव करणारी आणि साधारणपणे ५ ते १० वर्षे टिकणारी ताडपत्री,तर साधी ताडपत्री ही शेतातील पिके, जनावरांचा चारा झाकण्यासाठी किंवा तात्पुरत्या निवाऱ्यासाठी वापरली जाते.



### आंबेवाडीत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**खांब** : रोहा तालुक्यातील मौजे आंबेवाडी येथील शेतकरी चंद्रकांत लोखंडे यांच्या शेतावर जय हनुमान शेतकरी गटाच्या वतीने दशपर्णी अर्क व गोकृपा अमृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक व सेंद्रिय शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या या निविष्ठांचे महत्त्व व उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी शिवानी कदम, करुणा काळे, तृप्ती सावंत तसेच सहाय्यक कृषी अधिकारी ऋषिकेश कदम, अफसर इनामदार, विवेक खांडेकर आणि अनिकेत ननवरे उपस्थित होते. उपस्थित कृषी अधिकाऱ्यांनी दशपर्णी अर्क व गोकृपा अमृत तयार करण्याची शास्त्रीय पद्धत, त्यांचे पीक संरक्षणातील फायदे, जमिनीची सुपीकता वाढविण्यातील भूमिका तसेच रासायनिक कीटकनाशके व खतांचा वापर कमी करण्यासाठी या नैसर्गिक निविष्ठांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. या प्रात्यक्षिकास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलाव, नदीतील गोड्या माशांना भाव

- **बाजारात खवय्यांची खरेदीसाठी गर्दी**
- **मासे विकून कष्टकरी बांधवांचा उदरनिर्वाह**



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. तीव्र उन्हामुळे नदी, तलाव, धरणे आणि पाणवठे यांचे पाणी मोठ्या प्रमाणावर आटले आहे. या आटलेल्या पाण्यात आता गोड्या पाण्यातील मासेमारी जोरात सुरू झाली आहे. पाणी कमी झाल्यामुळे विविध प्रकारचे चविष्ट गोडे मासे मोठ्या प्रमाणात हाती लागत असून, ते बाजारात विक्रीसाठी येत आहेत. यामुळे उन्हाळ्याच्या या दिवसांत खवय्यांच्या उड्या आता चविष्ट गोड्या पाण्यातील माशांवर पडत असून बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.

नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे आणि ओहळ येथील पाणी आटत आल्यामुळे तिथे सापडणाऱ्या माशांची आवक बाजारपेठेत कमालीची वाढली आहे. यामध्ये मळे, कोलीम, म्हूऱ्या, शिवडा, अरलय, वाम, कोलंबी, मोठी शेवंड, कटला, फंटूस व खवल आदी माशांचा समावेश आहे. स्थानिक नागरिकांसह काही जण मुंबई, ठाणे आदी शहरांत राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना देखील उन्हाळ्याची ही खास भेट म्हणून गोडे मासे पाठवत आहेत.

पारंपरिक कोळी बांधवांबरोबरच प्रामुख्याने आदिवासी आणि गळभोई समाजातील लोक सध्याच्या कडक उन्हात खूप मेहनतीने हे मासे पकडत आहेत. नदी, तलाव, धरण येथे टायर ट्यूबवर बसून गाळाने व जाळी टाकून ही मासेमारी केली जात आहे. पाणी आटल्यामुळे मासे पकडणे सोपे झाले असून सध्या मासे खूप मिळत आहेत. हे मासे विकून या कष्टकरी बांधवांच्या हाती चार पैसे मिळत असल्याने त्यांचा उदरनिर्वाह चांगला सुरू आहे.

#### नातेवाईकांना गोड्या माशांची भेट

सध्या उन्हाळ्यामुळे गोड्या पाण्यातील मासे बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. शहरात असणाऱ्या नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून आम्ही हे गोडे मासे पाठवले आहेत. मळे, शिवडा, कटला व म्हूऱ्या हे मासे अनेकांना खूप आवडतात असे माणगाव येथील गृहिणी प्रियांका हेमंत गोसावी यांनी सांगितले आहे.

#### माशांचे दर

मळे: २०० ते २५० रुपये किलो, कोलीम (बारीक कोळंबी) : ५० ते ६० रुपये वाटा, म्हूऱ्या : ४० रुपये वाटा, शिवडा, कटला व वाम : ५०० ते ६०० रुपये किलो, मोठी गोडी कोलंबी (शेवंड) : १००० ते १२०० रुपये किलो, फंटूस : ३०० ते ४०० रुपये किलो.

## ‘खेती बचाओ’ अभियान उत्साहात

**। तळा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा अंतर्गत खरीप हंगाम शेतकरी मोहीम तसेच खेती बचाओ अभियान मौजे हनुमान नगर येथे उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, महिला शेतकरी गटाचे सदस्य तसेच शेतकरी गट मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. जीवन आरेकर, विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, रोहा यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, खतांचा संतुलित वापर, सेंद्रिय शेती तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या एल निनो जागरूकता मोहिमेअंतर्गत एल निनो या हवामान घटनेची माहिती देण्यात आली. एलनिनोमुळे पावसाचे अनियमित वितरण, काही भागात पर्जन्यमानात घट, पाण्याची टंचाई होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



एल निनोच्या संभाव्य परिणामांवर मात करण्यासाठी योग्य वेळेत पेरणी करणे, कमी कालावधीच्या वाणांचा वापर करणे, जलसंधारण उपाययोजना राबविणे, मल्चिंग व सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे, तसेच किड व रोग व्यवस्थापनासाठी नियमित पीक निरीक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले. शेतकऱ्यांनी हवामान आधारित कृषी सल्ल्याचा लाभ घेऊन पीक विमा योजनांचा लाभ घ्यावा, असे सांगण्यात आले. याशिवाय सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत, त्यामध्ये वापरण्यात येणारी विविध वनस्पतींची पाने, त्याची निर्मिती प्रक्रिया तसेच किड व रोग व्यवस्थापनामधील उपयुक्तता याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. डॉ. आरेकर यांनी शेतकऱ्यांसमोर दशपर्णी अर्क तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले व रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करून सेंद्रिय पर्यायांचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शनात कांबळे, तालुका कृषी अधिकारी, तळा यांनी कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदान योजना, पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण तसेच शेतकरी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास सचिन लोखंडे, शेतकरी गट व महिला शेतकरी गटाचे सदस्य, तसेच गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

## म्हसळा येथे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार आणि तहसीलदार सचिन खाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली म्हसळा तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापनावर आधारित मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने तहसीलदार सचिन खाडे यांनी सविस्तर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये विविध साहित्यांची तपासणी केली त्यात स्ट्रेचर,लाईफ जॅकेट, रिंग बॉईज, बॉडी कव्हर, फायर एक्सटिंगूशर इत्यादी साहित्याचा समावेश होता. सदर प्रशिक्षणामध्ये ग्रामस्थ, स्थानिक प्रशासकीय यंत्रणा, तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणा सहभागी होऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. अतिवृष्टी झाल्यास नागरिकांनी घाबरून न जाता त्वरित आपत्ती व्यवस्थापन समितीकडे संपर्क साधण्याचे आवाहनही सचिन खाडे यांनी करून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी जिल्हा स्तरावरून प्रशिक्षक शशिकांत शिरसाट, नितेश घरत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## गॅस-स्टोव्ह बंदीवरून व्यावसायिक आक्रमक

**। महाड । प्रतिनिधी ।**

शिवराज्याभिषेक ५ जून आणि ६ जून रोजी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर रायगड किल्ल्यावर गॅस, स्टोव्ह आणि अन्य ज्वालाग्रही साधनांच्या वापरावर घालण्यात आलेल्या निर्बंधांवरून स्थानिक व्यावसायिक आक्रमक झाले आहेत. त्यांनी महाडचे प्रांताधिकारी पोपट ओमासे यांची भेट घेत या आदेशाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. मात्र, हा निर्णय केवळ सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतल्याचे प्रशासनाने स्पष्ट करत सहकार्याचे आवाहन केले आहे. यावेळी व्यावसायिकांनीही सुरक्षिततेचे नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करू, असे आश्वासन दिले. मात्र, कोणत्याही दबावाखाली व्यावसायिकांवर अन्याय करण्याचा प्रयत्न झाल्यास ग्रामस्थ, व्यावसायिक आणि शिवभक्त एकत्रितपणे विरोध करतील, असा इशाराही देण्यात आला.



शिवराज्याभिषेकसोहळ्यासाठी रायगडावर मोठ्या प्रमाणात गर्दी अपेक्षित आहे. यामुळे बाजारपेठ ते जगदीश्वर मंदिर मार्ग तसेच चित्त दरवाजा ते होळीचा माळ परिसरात गॅस, स्टोव्ह आणि अन्य ज्वालाग्रही साधनांच्या वापरास मनाई करण्यात आली आहे.

खाद्यपदार्थ तयार करण्यास कोणतीही बंदी नसून ते सुरक्षित ठिकाणी तयार करून विक्रीसाठी आणता येतील, असेही प्रशासनाने सांगितले. दरम्यान, रायगड रोपवे कॅन्टीन आणि उत्सव समितीच्या भोजन व्यवस्थेत गॅस सिलेंडरचा वापर होत असताना केवळ स्थानिक व्यावसायिकांवरच निर्बंध का, असा सवाल व्यावसायिकांनी उपस्थित केला. यावेळी सर्व व्यावसायिक सुरक्षिततेची काळजी घेत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करतील, असे आश्वासन देण्यात आले.

## दहिवली पुलाचे काम संथगतीने

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील उल्हासनदीवर असलेल्या दहिवली मालेगाव येथील पुलाचे काम गेली दोन वर्षांपासून सुरु आहे. या पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून या पुलावरून दरवर्षी महापुराचे पाणी वाहून जात असते. हे पुलावरून पाणी गेल्यानंतर त्या काळात पुलावरील वाहतूक बंद होते.

तालुक्यातील कळंब, नेरळ, माथेरानला जेडणारा राज्य महामार्ग जात असल्याने या महामर्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरु असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे. या राज्य महामर्गावर अनेक गावा तसचे वाड्या जोडल्याने यांचा मोठ्या प्रमणात संपर्क येत असुन नेरळ शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या दहिवली नवीन पुलाचे काम गेल्या तीन वर्षापासुन संथ गतीने पाहायला मिळत आहे. पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने या ठिकाणी पुर्वी उभारण्यात आलेला पुल आहे. याची उंची कमी असल्याने मुसळ पाऊस पडल्यानंतर हा पुल पाण्याखाली जातो यामुळे अनेक गाव खेड्यांचा संपर्क तुटतो. यामुळे या गाव खेड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना दोन ते तीन दिवस आपल्या घरामध्ये बसून राहावे लागते.



दोन वर्षांपासून या पुलाचे कामाला सुरुवात झाली आहे. उल्हासनदी वरील या पुलाचे भागाचे आतापर्यंत खांबे उभारण्यात आले असल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. मात्र, हे काम संथ गतीने चालू असल्याने प्रशासन याकडे दुर्लक्ष करताना पाहायला मिळत आहे.

## व्यापाऱ्यांचे वीज अधिकाऱ्यांना निवेदन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात वारंवार वीज खंडित होत असते त्यामुळे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना व्यवसाय करणे अवघड होऊन बसते. नियमित वीज मिळावी यासाठी व्यापारी वर्गाने महा वितरण कार्यालयात जाऊन वीज अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली व मागण्यांचे निवेदन दिले.

कर्जत बाजार पेठेतील विशेषतः महावीर पेठेतील वीज खंडित होण्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. त्यामुळे व्यापारी वर्गाला व्यवसाय करणे कठीण हाऊन बसले आहे. वीज खंडित होत असल्याने विजेची उपकरणे बंद पडतात. तर काही निकामी होतात. ही समस्या गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहे.



ही समस्या दूर करण्यासाठी व्यापारी वर्गाने श्री शनी महाराज देवस्थानच्या रवी किरण सभागृहात विशेष बैठक आयोजित केली होती. या बैठकीस रोहित ओसवाल, निलेश हरिश्चंद्र, रणजीत जैन, मदन परमार, घेवरचंद ओसवाल, राजेश ओसवाल, मंगल परमार, अमित गुप्ता, ओटरमल ओसवाल, किरण जैन, कल्पेश जैन, कोरस जैन, राहुल देशमुख, विकी ओसवाल, रमेश प्रजापती आदी उपस्थित होते.

## पक्षांच्या हालचालीवरून पावसाचा अंदाज

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

आधुनिक तंत्रज्ञान, हवामान खात्याचे अंदाज आणि मोबाईलवरील विविध ॲप्स उपलब्ध असतानाही ग्रामीण भागातील अनेक शेतकरी आजही निसर्गातील घडामोडींवरून पावसाचा अंदाज बांधताना दिसून येत आहेत.

कावळ्याचे घरटे, मुंग्यांचे स्थलांतर, बिळाच्या तोंडाशी येणारे बेडूक आणि पक्ष्यांच्या हालचाली यावरून पावसाची चाहूल घेतली जाते. ज्येष्ठ शेतकऱ्यांच्या मते, कावळा झाडाच्या उंच व सुरक्षित फांदीवर घरटे बांधत असेल तर त्या वर्षी पावसाचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यता असते. तसेच मुंग्या मोठ्या प्रमाणात अन्नसाठा करताना किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करताना दिसल्यास पाऊस जवळ आल्याचे संकेत मानले जातात.



पावसाळ्यापूर्वीबेडूकबिळातून बाहेर पडून बिळाच्या तोंडाशी दिसू लागतात. वातावरणातील आर्द्रता वाढल्यामुळे त्यांच्या हालचाली वाढतात, असे शेतकरी सांगतात. याशिवाय ढगांची दिशा, वाऱ्याचा वेग, पक्ष्यांचे थवे आणि कीटकांच्या हालचाली यांचाही अभ्यास करून पावसाचा अंदाज बांधला जातो.

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी पेरणीचे नियोजन करताना अशा पारंपरिक संकेतांनाही महत्त्व देतात. आधुनिक हवामान अंदाजासोबतच पिढ्यान् पिढ्या चालत आलेले निसर्ग निरीक्षणाचे ज्ञान आजही शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. पावसाळा तोंडावर आला असताना शेतकरी आकाशाकडे नजर ठेवून आहेत. निसर्गातील या संकेतांमुळे पावसाच्या आगमनाबाबत उत्सुकता वाढली असून, शेतीच्या कामांना वेग देण्याची तयारी सुरू झाली आहे.

**विजयभाई मेथा यांच्या प्रेरणेतून नवा उपक्रम | पर्यावरणपूरक वाहतुक करण्याचा प्रयत्न**

# सायकल दिनानिमित्त ‘सायकल कट्टा’ची स्थापना

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकात्मता यांचा संदेश देणाऱ्या जागतिक सायकल दिनानिमित्त माणगावात सायकलप्रेमींसाठी एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सायकल कट्टा या नावाने स्थापन झालेला हा उपक्रम केवळ सायकलिंगपुरता मर्यादित नसून निरोगी जीवन, सकारात्मक विचार, पर्यावरण संरक्षण आणि मैत्रीची नाती अधिक दृढ करणारे व्यासपीठ ठरणार आहे.

या उपक्रमाचे नेतृत्व माणगावातील ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिक खेमचंद चुनीलाल तथा विजय मेथा यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. विशेष म्हणजे, वयाच्या ७२ व्या वर्षीही ते नियमित सायकलिंग करून तरुणांसमोर आदर्श निर्माण करत आहेत. त्यांची ऊर्जा, शिस्त आणि आरोग्याबाबतची जागरूकता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात अनेकजण शारीरिक हालचालींपासून दूर जात असल्याचे चित्र दिसून येते. वाढते प्रदूषण, जीवनशैलीजन्य आजार आणि मानसिक ताण या समस्यांवर सायकलिंग हा अत्यंत सोपा, किफायतशीर आणि प्रभावी उपाय मानला जातो. याच पार्श्वभूमीवर सायकल कट्टा हा उपक्रम नागरिकांना नियमित व्यायामाची सवय लावण्याबरोबरच पर्यावरणपूरक वाहतुकीकडे वळविण्याचा प्रयत्न करणार आहे.

उपक्रमाच्या माध्यमातून नियमित सायकल राईड्स, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संवर्धन मोहिमा तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



यावेळी आयोजकांनी नागरिकांना आवाहन करताना म्हटले की, दररोज थोडं पेडल मारूया, निरोगी आयुष्य आणि हरित भविष्य घडवूया. जागतिक सायकल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने सायकलला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवून स्वतःचे आरोग्य जपण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठीही हातभार लावावा लावण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नाव नोंदणी व संपर्क विजय मेथा ८०८७५६२१३३, स्नेहल मेथा कुराडे ८८८८३७३०३२, प्राची झेमसे - ९९७०८९८९८२ याच्यांशी संपर्क साधण्यास आयोजकांनी सांगितले आहे.

#### निःशुल्क प्रवेश

या समूहामध्ये महिला, पुरुष, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटांतील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. आर्थिक उत्कर्ष होईल. नव्या विचारांना चालना मिळू शकेल.
- **वृषभ** : अडचणींवर मात करता येईल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वाव मिळेल. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **कर्क** : कायदेशीर बाबतीत काळजी घ्या. महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील.
- **सिंह** : भागीदारी व्यवसायात बदल संभवतो. आप्तांच्या भेटीगाठी होतील. कामाचा उत्साह वाढता राहील.
- **कन्या** : अपेक्षित वार्ता कानी येईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. प्रेम प्रकरणात मतभेद टाळावेत.
- **तूळ** : वाढत्या खर्चाला आवर घालावा. आवडीच्या छंदांमध्ये रमाल. धार्मिक कार्याचं समाधान मिळेल.
- **वृश्चिक** : कौटुंबिक पातळीवर ताण राहील. कुलदेवतेची उपासना करावी. नवी कामं हाती घेता येतील.
- **धनु** : दिलासादायक घटना घडतील. कर्तव्यात कसूर होऊ देऊ नका. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **मकर** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. स्थावर प्रश्नात तडजोड होईल. गृहसजावटीला चालना मिळेल.
- **कुंभ** : महत्त्वाच्या घडामोडी घडतील. मनातील योजना आकारास येतील. विद्यार्थ्यांना अडचणी संभवतात.
- **मीन** : कोणावर अतिविश्वास हितावह ठरणार नाही. विचारानं रहावं. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.

स्टाईल स्टेटमेंट

## कमाल व्हाइट जीन्सची

सर्वसाधारणपणे ब्लू जीन्सलाच पसंती दिली जाते. मात्र तुम्ही व्हाइट जीन्सही कॅरी करू शकता. या रंगातही तुम्हाला भरपूर व्हरायटी बघायला मिळते. तुमच्या आवडीनुसार नॉर्मल बॉटम, बॉयफ्रेंड फिट, स्कीनी, अँकल लेंग्थ यापैकी कोणत्याही प्रकारची जीन्स तुम्ही निवडू शकता. व्हाइट जीन्सवर तुम्ही कोणत्याही रंगाचा टॉप घालू शकता. वेगवेगळ्या प्रिंट्सचं कॉम्बिनेशन करता येईल. व्हाईट जीन्स घालण्याचं तंत्र तुम्हाला जमायला हवं. ही जीन्स योग्य पद्धतीने कॅरी केली तर खूपच स्टायलिश दिसते. सकाळी स्कीनी व्हाइट जीन्सवर पांढरा किंवा पेस्टल रंगाचा टॉप घालता येईल. संध्याकाळी गडद रंगाचे टॉप कॅरी करा. व्हाइट जीन्सवर ऑफ शोल्डर टॉप्स शोभून दिसतील. अशा टॉप्समुळे पेहरावाचं संतुलन साधलं जातं आणि तुमचा बांधाही छान दिसतो. पांढऱ्या जीन्सवर त्याच रंगाचा टॉप घालणार असाल तर त्यासोबत निऑन रंगांच्या ॲक्सेसरीज कॅरी करा. स्नीकर्स, डँगलर्स, क्लच यापैकी काहीही चालून जाईल. व्हाइट डेनिमचे मिनी स्कर्टही उठून दिसतात. हा प्रकार सध्या ट्रेंडमध्ये आहेत. त्यामुळे जीन्स आणि स्कर्ट यापैकी कोणत्याही पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

## ५ जून

दिनविशेष

**१९८७** : सुप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ ग.ह.खरे यांचे निधन.
**२०१३** : गुजरातमधील लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागांसाठीच्या पोटनिवडणुकीत सर्व जागांवर भाजपने विजय मिळवला.
**२०१७** : 'इस्रो'ने तयार केलेल्या जीएसएलव्ही एमके□३ या सर्वात मोठ्या प्रक्षेपकाचे यशस्वी प्रक्षेपण.
**२०१८** : आवाक्याबाहेर गेलेल्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने द्वैमासिक पतधोरणात पाव टक्क्याने रेपोदर वाढवला.

सफर देशांची

## श्रीमंती थाटाचा लक्झम्बर्ग

लक्झंम्बर्ग हा युरोपातला छोटासा देश आहे. बेल्जियम, जर्मनी आणि फ्रान्स हे लक्झम्बर्गचे शेजारी. ९९९ चौरस मैल एवढाच त्याचा आकार आहे. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या या देशात घनदाट जंगलं, टेकड्या आणि कमी उंचीच्या पर्वतरांगा आहेत. देशाच्या उत्तर भागातली जमीन फार सुपीक नाही. मात्र दक्षिणेकडचा भाग 'सुजलाम सुफलाम' आहे. याच भागातून बऱ्याच नद्याही वाहतात. 'हौटे श्युअर' हा या देशातला सर्वात मोठा तलाव. इथे उन्हाळा फार कडक नसतो आणि थंडीही बोचरी नसते. लक्झंम्बर्गच्या डोंगराळ भागात हरणं, जंगली डुक्करं आणि लहान आकाराचे प्राणी आढळतात. या देशात बरेच स्थलांतरित पक्षी येतात. या देशात काही दुर्मीळ समुद्री प्राणी पहायला मिळतात. बटाटे, ओट्स, बार्ली आणि गहू ही या देशातली प्रमुख पीकं. दुग्धोत्पादनातही हा देश आघाडीवर आहे. आकाराने छोटा असणारा हा देश खूप श्रीमंत आहे. युरोपातल्या इतर देशांच्या तुलनेत इथे खूप कमी बेरोजगारी आहे. लक्झम्बर्ग मधले लोक जर्मन, फ्रेंच आणि लक्झम्बर्गिश अशा तीन भाषा बोलतात. युरो हे इथलं चलन आहे. इथल्या लोकांचं जीवनमानही खूप चांगलं आहे.

### पंचांग

**शुक्रवार, ५ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ कृ. ५, चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : ब्रह्मा,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१२

### फॉरवर्ड्स

**किस पिंजरे में क़ैद क़र दिया हैं इस बेदर्द ज़माने ने...**

**वो ज़ो दिल क़े मयख़ाने में क़भी आज़ाद साक़ी था...!**

आरोग्यमंत्र

## पांढऱ्याशुभ्र दातांसाठी...

प्रत्येकालाच पांढरेशुभ्र, मोत्यासारखे दात हवे असतात. मात्र आहारातील काही खाद्यघटक तसंच चुकीच्या सवयींमुळे दातांच्या नैसर्गिक रंगावर दुष्परिणाम होतो. या पदार्थांमुळे तोंडातली पीएचची पातळी बिघडते आणि दातांवर डाग पडू लागतात. म्हणूनच यासंबंधी सविस्तर माहिती घ्यायला हवी.



✻ तोंड आणि दातांशी संबंधित विकारांमुळे आणि त्यावरच्या उपचारांमुळे दातांचा रंग उडू शकतो. गरोदर स्त्रीला जंतूसंसर्गाची लागण झाली तर होणाऱ्या बाळाच्या दातांच्या रंगावर दुष्परिणाम होऊ शकतो. रेडिएशन, केमोसारख्या उपचारांमुळेही दातांच्या रंगावर परिणाम होतो. ✻ दातांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवायचा असेल तर खाल्ल्यानंतर चूळ भरायला हवी. पोकळ्यांमध्ये अन्नकण साठल्यास दात पिवळे पडतात, त्यांची झीज होते. ✻ फ्लोराइडचं प्रमाण जास्त असलेली टूथपेस्ट किंवा अशा पाण्याचा वापर केल्याने दातांचा पांढरा रंग फिका होऊ लागतो. त्याचबरोबर फ्लोरोसिस नावाच्या विकाराची शक्यता बळावते. या विकारामुळे दात पिवळट करडे दिसू लागतात. त्यांची झीज होते. दातांवर पांढरट डाग पडतात. ✻ औषधांमुळेही दातांवर परिणाम होतो. बेनेड्रिल, प्रतिजैविकं आणि उच्च रक्तदाबावरच्या साध्या औषधांमुळे दात पिवळे पडतात. आयर्न सिरप आणि माउथवॉशमध्ये असणाऱ्या घातक रसायनांमुळेही दातांवर डाग पडतात.

### फॅशन पॅशन

मुलांचं फॅशनविश्व पूर्णपणे बदलून गेलं आहे. पारंपरिक चेक्स, स्ट्राईप्सची जागा आता हटके प्रिंट्सनी घेतली आहे. टी शर्टसमध्येही प्रचंड व्हरायटी पहायला मिळते. रंगांमध्ये प्रयोग करायलाही मुलं कचरत नाहीत. वर्क कल्चर आता बरंच बदललं आहे. कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये कामासोबतच फॅशनला महत्त्व असतं. वीकेंडला कॅज्युअल्स कॅरी करता येतात. टेक्नॉलॉजीमुळे बरेच जण प्रवासातही काम करतात. त्यामुळे तेच ते टिपकल कपडे खरेदी करण्याची गरज उरलेली नाही. सध्या मुलांच्या फॅशनविश्वात काही रंगांची चलती आहे.

(क्रमश:)

करिअरवाटा

## स्वत:तील गुणवत्ता ओळखा

बदलत्या काळात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची गरज वाढते आहे. उद्योग क्षेत्रातील मनुष्य बळाचं व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांना सातत्यानं उत्तम गुणवत्ता असणाऱ्या उमेदवारांचा शोध घ्यावा लागतो. मात्र आता भारतातल्या उद्योगांसमोरचा कुशल मनुष्यबळाचा प्रश्न काहीसा सुटत आला आहे. शिक्षणाच्या व्यापक प्रचारामुळे हा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. अर्थात असं असलं तरी देशातील उद्योगक्षेत्राकडून गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची मागणी वेळेत पूर्ण होते का, हा विचारात घेण्याजोगा मुद्दा आहे.



भारतातील उद्योगक्षेत्र सतत गुणवत्तेच्या शोधात राहील, असं एक अहवाल म्हणतो. कारण गुणवत्ता ही जन्मजात असते. ती शिकवून साध्य होत नाही. त्यामुळे हा प्रश्नही सदोदित निर्माण होणार आहे. दुसरं म्हणजे भारतातल्या गुणवत्तेचा प्रश्न वेगळा आहे. भारतातली गुणवत्ता लपलेली आहे. अनेक गुणवान विद्यार्थ्यांना स्वत:च्या गुणवत्तेची जाणीवदेखील नाही. अशा विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित करणं गरजेचं ठरतं. या पार्श्वभूमीवर देशातील तरुणाईनेदेखील स्वत:मधील गुणवत्तेचा शोध घेण्याची गरज तज्ज्ञ व्यक्त करतात. हे साधलं तर तरुणाई स्वप्रगतीबरोबरच देशाच्या विकासास खंबीर आधार पुरवू शकेल यात शंका नाही.

खेचाखेची

## चाईल्ड सायकॉलॉजी

पुणेरी हॉटेल मधील एक पाटी
**'आमच्याकडे बालकामगार काम करत नाहीत.'**
पाटी वाचून पुणेरी काकू दुकानदाराला म्हणाल्या, मी बोलून बघू का एकदा मुलांशी? माझं ऐकतील कदाचित आणि करतील काम!

.
.
.

मी चाईल्ड सायकॉलॉजीमध्ये एमए□ आहे.

वेगळं काही

जर्मनीत ५ देशांच्या कलाकारांनी १७.६६ मीटर म्हणजेच ५७.९४ फूट उंच वाळूचा महाल तयार केला आहे. हा जागतिक विक्रम असून गिनिज बुकमध्ये त्याची नोंद करण्यात आली आहे. या कलाकारांचं नेतृत्त्व थोमास फान डेन डुंगेन यांनी केलं. नेदरलँड्स, हंगेरी, रशिया, लात्विया आणि पोलंड या देशांचे कलाकार या उपक्रमात सहभागी झाले होते. याआधी १६.६८ मीटर उंच वाळूचा महाल तयार करण्यात आला होता. जर्मनीतल्याच डुइसबर्गमध्ये हा महाल बनवण्यात आला होता. हा महाल बनवण्यासाठी ११ टन वाळूचा वापर करण्यात आला. हे बांधकाम करायला साधारण महिन्याभराचा वेळ लागला. पर्यटक नोव्हेंबरपर्यंत वाळूचा हा महाल बघू शकतात.

फॅशन पॅशन

## त्वचा घेईल मोकळा श्वास

पेहराव कितीही चांगला असला तरी त्याचं फिटिंग अंतर्वस्त्राच्या फिटिंगवर अवलंबून असतं. त्यामुळेच अंतर्वस्त्र दर्जेदार असावी. ही खरेदी करताना आपली त्वचा नेमकी कशी आहे याचाही विचार व्हावा. उदाहरणार्थ त्वचा संवेदनशील असेल आणि ब्रा च्या स्ट्रीप्स घट्ट असतील तर जखमा होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी काही उपाय योजता येतील.



✻ रात्री झोपण्यापूर्वी ब्रा काढून ठेवावी. यामुळे दिवसभर बंदिस्त असणाऱ्या त्वचेला श्वास घेता येईल. ✻ स्ट्रीप्सच्या त्रासापासून वाचण्यासाठी पेट्रोलियम जेली हा सर्वोत्तम पर्याय आहे. ब्रा चं इलॅस्टिक किंवा स्ट्रीप्स काचत असलेल्या ठिकाणी पेट्रोलियम जेली लावावी. यामुळे त्वचा मुलायम बनते. स्ट्रीप्सचे व्रणही रहात नाहीत. ✻ घामामुळे स्ट्रीप्सच्या ठिकाणी काळे डाग पडण्याची शक्यता असते. हे डाग घालवण्यासाठी स्क्रबिंग करता येईल. आठवड्यातून एकदा हा उपाय करावा. ✻ हातावर, चेहऱ्यावर मॉईश्चरायजर लावतात त्याप्रमाणे स्ट्रीप्स एरियावरही लावावं. लावताना थोडा मसाज केल्याने रक्तसंचार सुधारतो आणि व्रणांचं प्रमाण कमी होण्यास मदत होते.

## सुडोकू ११२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७ | | ६ | १ |
| | ७ | | | | | ८ | | |
| ५ | ६ | ३ | | | ४ | ९ | | |
| ९ | ८ | | ६ | | | १ | | |
| | १ | | ७ | ९ | २ | | ८ | |
| | | ६ | | | १ | | ९ | ७ |
| | | ९ | २ | | | ७ | १ | ६ |
| | | ८ | | | | | ३ | |
| ६ | ४ | | ३ | | | | | |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १११ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ८ | ९ | ७ | ५ | ४ | ६ | ३ |
| ४ | ६ | ३ | २ | १ | ८ | ५ | ९ | ७ |
| ७ | ९ | ५ | ४ | ६ | ३ | १ | २ | ८ |
| २ | ५ | ७ | ६ | ८ | १ | ३ | ४ | ९ |
| ८ | ३ | ४ | ५ | २ | ९ | ६ | ७ | १ |
| ६ | १ | ९ | ३ | ४ | ७ | ८ | ५ | २ |
| ९ | ७ | १ | ८ | ५ | ६ | २ | ३ | ४ |
| ५ | ८ | २ | ७ | ३ | ४ | ९ | १ | ६ |
| ३ | ४ | ६ | १ | ९ | २ | ७ | ८ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ११२



**आडवे शब्द :□**
१) बद्ध,जखडलेले
४) सरबत इ.पेय
६) नशा आणणारा,कैफी
८) विशेष
१०)मगज
११)भांडणे लावण्याचा एक प्रकार
१३) पुष्पगुच्छ
१४)स्वच्छ,चकचकीत
१७)रुपेरी मुलामा
१९) धुंदी
२१)हाणामारी
२३)पाण्याचा उसळणारा तरंग
२४)चावी
२५)बर्फाचा पर्वत
२७) गवंड्या जवळची पाणी वाहून नेण्याची पिशवी
२९) भाकडकथा,कंटाळवाणे भाषण
३२) चोरी न करणे
३३) रंग
३५) रचण्याची क्रिया वा रचण्याची मजुरी
३७)भोजनालय
३९)तर्क,अंदाज,अनुमान
४१)दारावर केलेला खुणेचा आवाज
४३)श्वासोच्छ्वास
४५) एक कोल्हापुरी दागिना
४६)उसाचा रस काढण्याचे एक यंत्र,एक ऋषी
४७)पुन्हा
४८)हाताचा एक भाग
५२)महिरप
५४)करमणूक
५६) काना जवळचा भाग
५७) काठ,बाजू
५८) कमळ
५९) कायद्याप्रमाणे
६१) बारा वर्षाचा काळ
६३) कामातील कौशल्य
६५) युद्ध
६७) ममता,प्रेम
६८) गोमाता
६९) काढलेली सुट्टी
७०) रांग,ओळ
७२) प्रवेशकर
७४) दगदग,उपद्रव,कष्ट
७६) खेद,दु:ख
७७) भिंतीवर सरपटणारा प्राणी
७८) फणसातील खाद्यभाग
८०)धपाटा
८२) किंमत,निष्ठा
८३) उद्याच्या नंतरचा दिवस
८६) वजनदार
८८) सरसकट
९०) कबूतर
९१) गरोदर स्त्रिच्या इच्छा पुरविणे
९३) दही घुसळण्याचे साधन
९४) शिव्याशाप
९५) अंड्यातील पिवळा भाग

**उभे शब्द:□**
१) निर्ढावलेला,बेशरम
२) नड,आवश्यकता
३) सरोवर
४) स्वत:ला
५) नूतन
६) विपुलता,रेलचेल
७) कुराणातील पवित्र वचने
८) चामड
९) अतिशय उदार माणूस
१२) दुर्मिळ,बहुमोल
१५) शेतीचा एक हंगाम
१६) संरक्षक भिंत
१८) थेट,सरळ न थांबता
२०) शिवाजी महाराजांनी बोटे कापलेला मुस्लीम सरदार
२२) आंब्याची एक जात
२६) पत्रातील मजकूर
२८) मीठाची चव
३०) समुद्र
३१)दूर करणारा(रोग वगैरे )
३४) चिंच कुसकरलेले पाणी
३६) परमेश्वर
३८) वस्त्र,कापड
३९) बकरा
४०) फुलाची प्रथमावस्था
४१) घट्ट,निबर,कडक
४२) पर्वताचा उंच तुटलेला कडा
४४) आयताकृती जाजम
४५) आंब्याची पोळी
४७) पंख
४८) अंत:करण
४९) गळ्यामागचा अवयव
५०) काळ्या तोंडाचे मोठे माकड
५१) महिला
५३) पाषाण
५५) अळशी धान्याचे एक नाव
५६) दर्शनासाठी काशीस जाणे
५८) वहिवाट,जाणे येणे
५९) शासन करणारे मंत्रीमंडळ
६०) एक श्वासरोग
६२) पुन्हा□पुन्हा
६४) संपूर्ण
६६) मला
७१) अंगातील मस्ती,जोम
७३) तपासणी करणे
७५) प्रफुल्लित
७७) बासरी
७९) राजकुमार
८१) एक जुनी लेखणी
८२) झुणक्याबरोबरचे कोरडे पिठले
८४) कणीदार
८५) उष:काल
८७) भीती
८९) पत्र,डाक
९१) नयन,लोचन
९२) जहर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# आरडीसीएचे ऐतिहासिक आयोजन

- पहिल्यांदाच भरवली महिला प्रीमियर लीग
- चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर विजयी



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला टी-२० प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा गव्हाण येथील छ. शिवाजी महाराज मैदानावर पार पडली. या स्पर्धेत चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाने अंतिम विजयी संघ होण्याचा मान मिळवला आहे.

या स्पर्धेत अतिशय अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाने खोपोली क्रिकेट असोसिएशन संघाचा १३ धावांनी पराभव करत स्पर्धेची चॅम्पियनशिप पटकावली. यावेळी प्रथम फलंदाजी करतांना चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाने निर्धारित २० षटकांत ४ फलंदाज बाद १४३ धावा काढल्या. त्यामध्ये अमिषा बामणे हिने सर्वाधिक ३८ धावा काढल्या. तर, मनस्वी गोड हिने बहुमूल्य ३४ धावा काढून संघाला योगदान दिले. खोपोली क्रिकेट असोसिएशन संघाकडून श्रावणी मोरे हिने २, तर समृद्धी कांबळे हिने १ फलंदाज बाद केला. त्यानंतर १४४ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीला आलेल्या खोपोली क्रिकेट असोसिएशन संघाचा डाव निर्धारित २० षटकांमध्ये ५ फलंदाज बाद १३० धावसंख्यावर थांबला. त्यामध्ये ज्ञानेश्वरी येरूणकर हिने दमदार फलंदाजी करत सर्वाधिक ५२ धावा काढल्या. तर, काव्या धाडवे हिने २० धावांची खेळी केली. चॅम्पियन्स खारघर संघाकडून हेतवी रावासिया हिने ३, तर वेदिका तेटगुरे हिने २ फलंदाजाना बाद केले.

चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाचे संघमालक आकाश पटरिया यांनी आपल्या संघाच्या कामगिरी बद्दल आनंद व्यक्त केला आहे. तर, खोपोली क्रिकेट असोसिएशन संघ मालक यशवंत साबळे यांनी आपल्या संघातील खेळाडूंनी शेवट पर्यंत कडवी झुंज दिल्याबद्दल मुलींचे कौतुक केले. यावेळी अंतिम सामन्यातील प्लेअर ऑफ दि मॅच म्हणून हेतवी रावासिया, फायटर ऑफ दि मॅच ज्ञानेश्वरी येरूणकर, उत्कृष्ट फलंदाज अपर्णा सिंह, उत्कृष्ट गोलंदाज हेतवी रावासिया, वूमन ऑफ दि सिरिज समृद्धी कांबळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक वेदिका तेटगुरे, उत्कृष्ट यष्टिरक्षक अपर्णा सिंह यांची निवड करण्यात आली. तसेच, आरडीसीएच्यावतीने समृद्धी कांबळे, समिधा तांडेल, स्वरा खेडेकर व अमिषा बामणे यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, कार्याध्यक्ष यशवंत साबळे, उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य संजय तावडे, अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, नरेंद्र मयेकर, प्रदीप खलाटे, विनय पाटील, आदेश क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सुजित ठाकूर यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

## निवडक




### लातूरची जालन्यावर थरारक मात

**सोलापूर :** नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत बुधवारी मुलींच्या गटात नंदुरबार आणि धुळे यांनी चुरशीच्या लढतीत निसटते विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. तर, कुमार गटात मध्यंतराला पिछाडीवर असलेल्या लातूरने जालनावर शानदार पुनरागमन करत विजय मिळवला. मुलींच्या गटातील अत्यंत रंगतदार सामन्यात नंदुरबारने जळगाववर ३६-३१ अशी मात करत उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले. मध्यंतराला १९-१७ अशी मिळालेली आघाडी अखेर निर्णायक ठरली. दुसऱ्या चुरशीच्या सामन्यात धुळ्याने रायगडचा ३१-२८ असा निसटता पराभव करत पुढील फेरी गाठली. मध्यंतराला १२-२२ अशी पिछाडी असूनही रायगडने जोरदार पुनरागमनाचा प्रयत्न केला. कुमार गटातील दिवसातील सर्वाधिक लक्षवेधी सामन्यात लातूरने मध्यंतराच्या १३-१६ अशा पिछाडीवरून पुनरागमन करत जालनाचा ३४-३१ असा ३ गुणांनी पराभव केला. कुमार गटातील आणखी एका चुरशीच्या सामन्यात धुळ्याने परभणीवर ४०-३४ असा ६ गुणांनी विजय मिळवला. दिवसभरातील बहुतांश अन्य सामने पूर्णपणे एकतर्फी झाले. अनेक संघांनी प्रतिस्पर्ध्यांचा अक्षरशः धुव्वा उडवत किंवा दणदणीत पराभव करत पुढील फेरीतील आपली दावेदारी भक्कम केली. स्पर्धेची पातळी आणि संघांमधील स्पर्धात्मकता पाहता पुढील बाद फेरीतील सामने अधिक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




### भारताने उडवला कोरियाचा धुव्वा

**काकामिगाहारा :** कर्णधार केतन कुशवाहाचे दोन शानदार गोल आणि बचावात्मक फळीच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर भारताने १८ वर्षांखालील आशिया चषक हॉकी स्पर्धेत दक्षिण कोरियाचा ४-१ असा धुव्वा उडवला. पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात प्रत्येकी दोन गोल डागत भारताने 'पूल ए'मध्ये अव्वल स्थान काबीज केले आहे. तिसऱ्या मिनिटाला राहुल यादवने दिलेल्या उत्कृष्ट पासवर कर्णधार केतन कुशवाहाने गोल करण्याचा प्रयत्न केला. कोरियाच्या गोलरक्षकाने पहिला प्रयत्न परतावून लावला, परंतु रिबाऊंडवर केतनने चपळाईने चेंडू जाळ्यात धाडून भारताचे खाते उघडले. या सुरुवातीच्या धक्क्यातून कोरिया सावरण्यापूर्वीच, ५ व्या मिनिटाला गाझी खानने दिलेल्या पासवर अनमार्क असलेल्या वरिंदर सिंगने दुसरा गोल करत भारताला २-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रात २१ व्या मिनिटाला कोरियाला पेनल्टी कॉर्नर मिळाला. याचे त्यांचा कर्णधार युन जेह्युकने गोलमध्ये रूपांतर करून फरक २-१ असा कमी केला. मात्र, मध्यंतरानंतर भारताने पुन्हा एकदा सामन्यावर नियंत्रण मिळवले. ३६ व्या मिनिटाला केतन कुशवाहाने वैयक्तिक दुसरा गोल करून भारताला ३-१ ने पुढे नेले. पुढे शाहरूख अलीने एक गोल करत भारताचा ४-१ असा विजय निश्चित केला. या विजयानंतर ''पूल ए'' मध्ये भारत, दक्षिण कोरिया आणि जपान हे तिन्ही संघ प्रत्येकी ६ गुणांसह बरोबरीवर आहेत.

### हरमनप्रीत कौरने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघाने इंग्लंडविरुद्धचा तिसरा आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामना गमावला असला तरी, तिने एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. तिने आता न्यूझीलंडच्या सुझी बेट्सला मागे टाकून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी महिला खेळाडू बनण्याचा मान मिळवला आहे. तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाला इंग्लंडकडून ६ गडी राखून पराभव पत्करावा लागला. मात्र, कर्णधार हरमनप्रीत कौरने मैदानात पाऊल ठेवताच इतिहास रचला. महिला क्रिकेटमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम तिच्या नावावर आहे. हा हरमनप्रीतचा ३६८ वा सामना होता. यापूर्वी न्यूझीलंडच्या सुझी बेट्सनं ३६७ सामने खेळले होते. हरमनप्रीत कौरने आतापर्यंत ७ कसोटी सामने, १६४ एकदिवसीय आणि १६४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. तिने भारतासाठी सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम मिताली राजचा विक्रम मोडला आहे. मिताली राजने तिच्या कारकिर्दीत एकूण ३३३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.




''ए लीजंड विथ डिफरन्स '' या दिलीप वेंगसरकर यांच्यावरील संजय साटम लिखित पुस्तकाच्या प्रकाशन समारंभ नुकताच पार पडला. या प्रसंगी भारताचे आजी-माजी कसोटीपटू व रणजीपटू उपस्थित होते.

## आर्यना सबालेंकाचा ओसाकावर विजय

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

अव्वल मानांकित आर्यना सबालेंका हिने नामोमी ओसाकाचे आव्हान ७-५, ६-३ असे दोन सेटमध्ये मोडीत काढले आणि फ्रेंच ओपन स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. या स्पर्धेत तिला अद्याप विजेतेपद मिळवता आलेले नाही. गतवेळेस तिचा अंतिम सामन्यात कोको गॉफकडून पराभव झाला होता. फ्रेंच ओपन अद्याप जिंकता आलेली नसली तरी सबालेंकाच्या खात्यात ४ ग्रँड स्लॅम विजेतेपद आहेत. ओसाकाविरुद्ध तिचे नेहमीच वर्चस्व राहिलेले आहे. आतापर्यंतच्या दोघींमधील लढतीत सबालेंका ३-१ असे पुढे आहे. उपउपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात सबालेंकाने ओसाकावर बेसलाइनच्या खेळावरून वर्चस्व राखले. तिचे फोरहँडचे फटकेही ताकदवर होते. प्राईम टाईममध्ये महिलांचे सामने नियोजित न केल्यामुळे फ्रेंच ओपन संयोजकांवर टीका केली जात आहे; परंतु, महिलांचे दोन सेटमध्ये संपणाऱ्या सामन्यांना प्रेक्षकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही, तसेच ब्रॉडकास्टर्सनाही त्याचा फायदा होत नाही, असे कारण देण्यात येत आहे.

## विश्वचषकातून वेस्ट इंडिजची 'एक्झिट'?



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या वेस्ट इंडिज आणि श्रीलंका यांच्यामध्ये एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू आहे. दरम्यान, या मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजचा पराभव झाला आहे. त्यामुळे विश्वचषक २०२७ मध्ये वेस्ट इंडिजचा प्रवेश खडतर झाला आहे.

२०२७ मध्ये क्रिकेटचा विश्वचषक खेळवला जाणार आहे. ही स्पर्धा दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणार आहे. मात्र, या स्पर्धेसाठी आतापासूनच लढाई सुरू झाली आहे. वेस्ट इंडिज आणि श्रीलंका यांच्यासाठी ही मालिका महत्वाची असणार आहे. पहिल्याच सामन्यात यजमान वेस्ट इंडिजला पराभवाचा सामना करावा लागल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

श्रीलंका क्रिकेट संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे. या ठिकाणी दोन्ही संघांमध्ये एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. श्रीलंकेचा संघ ३०३ रन्स केल्या होत्या. वेस्ट इंडिजडच्या संघाला २६२ च रन्स करता आल्या. त्यामुळे वेस्ट इंडिजचा दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे विश्वचषकात पात्र होण्यासाठी वेस्ट इंडिज आणि श्रीलंकेच्या संघाला मालिका जिंकण्यासाठी प्रयत्न करावे लागणार

### पात्रतेचे गणित

**३१ मार्च, २०२७ पर्यंत आयसीसी क्रमवारीत पहिल्या ८ संघाना विश्वचषकात प्रवेश मिळणार आहे. सध्याच्या ताज्या आकडेवारीनुसार श्रीलंका ६ व्या स्थानावर आहेत. तर, वेस्ट इंडिजचा संघ १० व्या स्थानावर आहे. विश्वचषकात प्रवेश घेण्यासाठी वेस्ट इंडिजला टॉप ८ मध्ये येणे अपेक्षित आहे. २०२३ च्या विश्वचषकात वेस्ट इंडिजचा संघ पात्र ठरू शकला नव्हता.**

## फायटर्स क्रिकेट अकॅडमी विजयी



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

झुंझार युवक मंडळ पोयनाड तर्फे चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या पै. अन्वर बुराण स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत अंतिम विजयी संघ होण्याचा मान मिळवला आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील ८ संघाने सहभाग घेतला होता. ही स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा अंतिम सामना बुधवारी (दि.३) झुंझार युवक मंडळ पोयनाडच्या मैदानावर खेळला गेला. यावेळी नाणेफेकीचा कौल जिंकत फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने प्रथम फलंदाजी करतांना निर्धारित ४० षटकांमध्ये २१५ धावा काढल्या. त्यामध्ये यश देढे यांनी सर्वाधिक ७४ धावांची खेळी केली. त्याला ऋग्वेद जाधव (५०), पार्थ मस्के व ईशान काटे यांनी प्रत्येकी १६ धावा काढून साथ दिली. कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी कडून सोहम अडसूळ, यश पार्टे यांनी प्रत्येकी ३ व स्वाभिमान बेज यांनी २ फलंदाज बाद केले. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाचा डाव ९३ धावत आटोपला. शुभंकर माने यांनी १७, वेदांत सांगळे यांनी १६ धावा काढल्या. माणगाव संघाकडून रयान जोशी व पार्थ मस्के यांनी प्रत्येकी ४ फलंदाजांना तंबूत धाडले. त्यामुळे माणगाव संघाने सामना १२२ धावांनी जिंकला.

## ''वैभव सूर्यवंशीसारखी खो-खोतही कामगिरी करा''




**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

कुमार आणि कुमारी गटातील खो-खोपटूंनी क्रिकेटमधील युवा सनसनाटी वैभव सूर्यवंशी याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून स्पर्धेत आपली सर्वोत्तम कामगिरी साकारावी, असे प्रेरणादायी आवाहन माजी आमदार दिलीप माने यांनी केले. कमी वयात सातत्य, मेहनत आणि दर्जेदार कामगिरीच्या जोरावर वैभव सूर्यवंशीने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचप्रमाणे खो-खो खेळाडूंनीही जिद्द, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा झेंडा उंचावावा, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन आणि किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उद्घाटन नेहरूनगर येथील शासकीय मैदानावरील स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे होते. कार्यक्रमात सोलापूरची राष्ट्रीय खो-खोपटू स्नेहा लामकाने हिने उपस्थित खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी अत्यंत महत्त्वाची घोषणा केली. यापुढे राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनासाठी कोणत्याही जिल्हा संघटनेकडून किंवा आयोजक संस्थेकडून रॉयल्टी आकारली जाणार नाही, असे जाहीर केले.

## युद्धाचा इराणच्या तयारीवर परिणाम

**। अंताल्या । वृत्तसंस्था ।**

काही दिवसांवर आलेल्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेसाठी इराणने आपला २६ खेळाडूंचा अंतिम संघ जाहीर केला आहे. त्यात १७ स्थानिक खेळाडूंचा समावेश आहे; परंतु, अमेरिकेकडून सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे हे खेळाडू खेळत असलेल्या क्लबचा फेब्रुवारीपासून एकही सामना झालेला नाही. अमेरिका आणि इस्राईल यांच्याविरोधातील युद्धात त्याने इराणच्याच सरकारवर सोशल मीडियातून राग व्यक्त केला होता.




### राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी | संघांचा उपांत्य फेरीत धडाकेबाज प्रवेश

## नेहरु नगरमध्ये रंगला खो-खोचा थरार

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उपांत्यपूर्व फेरीतील कुमार गटात धाराशिव, पुणे, मुंबई उपनगर आणि सोलापूर, तर मुलींच्या गटात सांगली, सोलापूर, धाराशिव आणि ठाणे यांनी दमदार विजयांसह उपांत्य फेरीत धडाकेबाज प्रवेश केला आहे.



कुमार गटातील सर्वाधिक चुरशीच्या सामन्यात सोलापूरने ठाण्याचा ४२-४० असा २ गुणांनी निसटता पराभव केला. मध्यंतरास दोन्ही संघ २०-२० अशा बरोबरीत होते. मात्र, मध्यंतरापूर्वी आणि अंतिम डावात मिळालेल्या प्रत्येकी एका ड्रीम रनमुळे सोलापूरच्या विजयाचा पाया रचला गेला. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिवने अहिल्यानगरचा ४९-२८ असा दणदणीत पराभव करत धुव्वा उडवला. हरद्या वसावे आणि राज जाधव यांच्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर धाराशिवने एकहाती वर्चस्व गाजवले. तिसऱ्या सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीला ४०-३६ असे नमवत उपांत्य फेरीचे तिकीट निश्चित केले. मध्यंतरातील २४-१६ ही आघाडी निर्णायक ठरली. समर्थ सावंत आणि अमेय मुर्चावडे यांनी मुंबई उपनगरचा विजय साकारला. चौथ्या सामन्यात पुण्याने साताऱ्याचा ४८-३६ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

मुलींच्या गटातील सर्वाधिक रंगतदार सामन्यात धाराशिवने पुण्याचा २७-२६ असा अवघ्या एका गुणाने पराभव करत उपांत्य फेरीत धमाकेदार प्रवेश केला. मध्यंतरास १५-११ अशी आघाडी घेतलेल्या धाराशिवने शेवटपर्यंत संयमी खेळ करत विजय खेचून आणला. दुसऱ्या सामन्यात सोलापूरने नाशिकचा २९-२१ असा एक डाव राखून दणदणीत पराभव केला. स्नेहा लामकाने आणि अश्विनी मांडवे यांच्या अष्टपैलू खेळीसमोर नाशिकचा बचाव निष्प्रभ ठरला. तिसऱ्या सामन्यात सांगलीने रत्नागिरीचा २९-१२ असा एक डाव राखून धुव्वा उडवला. विद्या तामखेडे आणि धनश्री तामखेडे यांनी सांगलीचा विजय साकारला. चौथ्या सामन्यात ठाण्याने साताऱ्यावर ३३-२० अशी ५.५० मिनिटे राखून प्रभावी मात केली. धनश्री कंक आणि प्रणिती जगदाळे यांनी ठाण्याच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)